मंगळवार, ६ जून २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२६५
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • TUESDAY 6 June 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-265 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5

# मान्सूनला चक्रीवादळाचा अडथळा

## राज्यासह देशात काही ठिकाणी मान्सूनपूर्व पावसाला सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : भारतात मान्सून 1 जूनपर्यंत दाखल होत असतो. पण यंदा मान्सून केरळमध्ये उशिरा पोहोचण्याची शक्यता आहे. दुसरीकडे मान्सून सुरू होतानाच अरबी समुद्रात चक्रीवादळ निर्माण होण्याची शक्यता आहे. अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण होईल. कमी दाबाचे क्षेत्र वाढत जाऊन त्याचे चक्रीवादळात रुपांतर होण्याचा अंदाज स्कायमेट या हवामान संस्थेने वर्तवला आहे. असे असले तरी आयएमडीकडून चक्रीवादळासंदर्भात अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.**



हवामान तज्ज्ञांच्या मते आतापर्यंतचा जो अंदाज आहे त्यानुसार 10 ते 15 जून दरम्यान हे चक्रीवादळ महाराष्ट्रापासून एका सुरक्षित अंतरावर धडकण्याचा अंदाज आहे. हे चक्रीवादळ त्याच्यासोबत मान्सूनचे वारे ओढेल आणि जवळपास 12 जूनपर्यंत गोवा आणि कर्नाटकाच्या किनारपट्टीवर मान्सूनच्या आगमनाची शक्यता आहे. त्यानंतर एक- दोन दिवसात म्हणजे 14 जूनपर्यंत मान्सून हा दक्षिण कोकणात दाखल होण्याची शक्यता आहे. मुंबईत दरवर्षी 11 जूनपर्यंत मान्सून दाखल होतो परंतु सध्याची परिस्थिती पाहता 15 जूनपर्यंत मान्सून दाखल होणार नाही. अरबी समुद्रात चक्रीवादळाची निर्मिती होण्याची शक्यता आहे. समुद्र खवळलेला असेल त्यामुळे महाराष्ट्रात मान्सून उशीराने दाखल होण्याची शक्यता आहे. चक्रीवादळान समुद्रातील बाष्प खेचून नेण्याची शक्यता आहे. त्यामुळे महाराष्ट्रात मान्सूनचे आगमन उशिराने होण्याचा अंदाज आहे. चक्रीवादळाची निर्मिती झाल्यास त्याचं नाव बिपरजॉय असणार आहे. याआधी मागील तीन ते चार वर्षात अरबी समुद्रात निसर्ग, तोक्ते आणि वायू चक्रीवादळाची निर्मिती झाल्याचे बघायला मिळाले आहे.

**महाराष्ट्रात मान्सून पूर्व पावसाची हजेरी :** पुढील 24 तासात अरबी समुद्रात कमी दाबाचे क्षेत्र दक्षिण–पूर्व अरबी समुद्रात तयार होणार आहे . पुढील 48 तासात कमी दाबाच्या क्षेत्राचे डिप्रेशनमध्ये रुपांतर होण्याचा भारतीय हवामान विभागाचा अंदाज आहे . या सिस्टीमचा मान्सूनवर प्रभाव पडणार असून यावर भारतीय हवामान विभाग लक्ष ठेवून असल्याची माहिती आहे . 9 जूनपर्यंत केरळात मान्सून दाखल होण्याचा स्कायमेटचा अंदाज आहे . त्यामुळे पुढील दोन ते तीन दिवस महत्त्वाचे आहे . राज्यासह देशात काही ठिकाणी मान्सूनपूर्व पावसाला सुरुवात झाली आहे . राज्यात बहुतेक जिल्ह्यांमध्ये मान्सून पूर्व पावसाची हजेरी लावली आहे .

# देशातील सर्वोत्तम टॉप १० विद्यापीठाच्या यादीतून महाराष्ट्र बाहेर

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** आज केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून नॅशनल इन्स्टिट्यूट रँकिंग फ्रेमवर्क 2023 म्हणजेच, देशभरातील शैक्षणिक संस्था, विद्यापीठांचं रँकिंग जारी करण्यात आलं आहे. या यादीत निराशाजनक बाब म्हणजे, देशातील सर्वोत्तम टॉप १० विद्यापीठांच्या यादीत महाराष्ट्रातील एकाही विद्यापीठाला स्थान मिळालेले नाही.

मुंबई आयआयटीनं देशातील इंजिनिअरिंग शिक्षण संस्थांच्या यादीत तिसरा क्रमांक मिळवला आहे, तर रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये देशातील शैक्षणिक संस्थांमध्ये मुंबई आयआयटी चौथ्या क्रमांकावर आहे. तर इनोव्हेशनच्या बाबतीत देशात मुंबई आयआयटीचा सातवा क्रमांक आहे. तर देशातील दंत महाविद्यालयांच्या यादीमध्ये पुण्याच्या डी.वाय. पाटील विद्यापीठ तिसऱ्या क्रमांकावर आहे.

टॉप विद्यापीठांच्या यादीत टॉप १० मध्ये महाराष्ट्रातील एकाही विद्यालयाचा समावेश नाही. सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ हे या यादीत 19व्या क्रमांकावर आहे. तर मुंबईतील इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी 23व्या क्रमांकावर आहे. तसेच, पुण्यातील सिम्बायोसिस इंटरनॅशनल हे या यादीत 32व्या क्रमांकावर आहे.

# औरंग्याचं नाव घ्याल तर माफी नाही : फडणवीस

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** अहमदनगरच्या मुकुंदनगरमध्ये एका उरूसानिमित्त निघालेल्या मिरवणुकीत तरुणांनी औरंगजेबाचा फोटो झळकविला. याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर त्यावर प्रतिक्रिया उमटत आहेत. उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही याची गंभीर दखल घेतली आहे. हे सहन केले जाणार नाही, जर कुणी औरंग्याचं नाव घेत असेल तर त्याला माफी नाही, असे फडणवीस यांनी म्हटले आहे. भाजपचे आमदार नीतेश राणे यांनीही यावर संतप्त प्रतिक्रिया दिली आहे.

रविवारी रात्री फकिरवाडा परिसरात हजरत दमबाहरी हजरत यांच्या उर्स निमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीत औरंगजेबचे पोस्टर झळकविल्याचा प्रकार समोर आला आहे. शहरातील मुकुंदनगर परिसरातून चादर अर्पण करण्यासाठी मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणुकीत काही जण औरंगजेबचा फोटो असलेले फलक घेऊन नाचत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. या प्रकरणी चौकशी सुरू असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. याचे पडसाद राज्यातही उमटले असून वातावरण तापण्यास सुरुवात झाली आहे.

# 'त्या' वृत्तावर साक्षी मलिकचा ट्विट करत खुलासा



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष आणि भाजपा खासदार यांच्याविरोधात कुस्तीपटू साक्षी मलिक, बजरंग पुनिया आणि विनेश फोगाट आंदोलन करत आहेत. शनिवारी मध्यरात्री कुस्तीपटूंनी गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेत चर्चा केली होती. यानंतर सोमवारी साक्षी मलिकने आंदोलनातून माघार घेतली असल्याचे वृत्त पसरले होते. यावर आता साक्षी मलिकने खुलासा केला आहे. दिल्ली भाजपा महिला मोर्चाच्या अध्यक्षा वैशाली पोतदार यांनी साक्षी मलिकने आंदोलनातून माघार घेतलं असल्याचं ट्वीट केलं होतं. त्या म्हणाल्या की, कुस्तीपटूंच्या आंदोलनातून साक्षी मलिकने माघार घेतली आहे. ती पुन्हा रेल्वेच्या कामावर रुजू होणार आहे. आंदोलनातून माघार घेणार असल्याच्या वृत्तावर साक्षी मलिकने ट्वीट करत खुलासा केला आहे. तिने म्हटले की, हे वृत्त पूर्णपणे चुकीचे आहे. न्यायासाठीच्या लढाईत आमच्यातील कोणी मागे हटले नाही आणि हटणारही नाही. आंदोलनाबरोबर मी रेल्वेतील जबाबदारी पार पाडत आहे. न्याय मिळेपर्यंत आमचा लढा सुरूच राहिल. कृपया चुकीचे वृत्त पसरवू नका. आम्ही गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेत चर्चा केली. तेव्हा त्यांना ब्रिजभूषण सिंग यांच्या अटकेची मागणी केली. आम्ही आंदोलनातून माघार घेतली नाही. मी रेल्वेच्या कामावर रुजू होणार आहे. न्याय मिळेपर्यंत आमचे आंदोलन सुरूच राहणार आहे. तसेच, मुलीने एफआयआर मागे घेतल्याचे वृत्तही चुकीचे आहे, असे साक्षी मलिकने 'एएनआय' या वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले. बजरंग पुनियानेही ट्वीट करत स्पष्टीकरण दिले आहे. आंदोलनातून माघार घेत असल्याचे वृत्त अफवा आहे. आम्हाला नुकसान पोहचवण्यासाठी वृत्त पसरवले जात आहे. आम्ही ना माघार घेतली आहे, ना आंदोलन मागे घेतले आहे. महिला कुस्तीपटूने एफआयआर मागे घेतल्याचे वृत्तही खोटे आहे. न्याय मिळेपर्यंत आमची लढाई सुरुच राहणार, असे बजरंग पुनियाने म्हटले आहे.

# गँगस्टर मुख्तार अन्सारीला 32 वर्षानंतर जन्मठेपेची शिक्षा

## अवधेश राय हत्याकांड प्रकरण


आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** गँगस्टर मुख्तार अन्सारीला वाराणसीने एमपी-एमएलए कोर्टाने 32 वर्षानंतर जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. गँगस्टर मुख्तार अन्सारीला अवधेश राय हत्याकांड प्रकरणी कोर्टाने शिक्षा सुनावली आहे. तसेच एक लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. अवधेश राय हत्याकांड प्रकरणी वारणसीच्या एमपी एमएलए कोर्टाने सोमवारी दोषी ठरवले. त्यानंतर लंच ब्रेकनंतर मुख्य निकाल दिला आहे. कोर्टाने हत्याकांडातील दोषी मुख्तार अन्सारी जन्मठेप सुनावली आहे. आयपीसीच्या कलम 302 अंतर्गत मुख्तार अन्सारी यांना मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. गेल्या वर्षभरात मुख्तार अन्सारीला वेगवेगळ्या चार प्रकरणात शिक्षा सुनावण्यात आली आहे. परंतु अवधेश राय हत्याकांड प्रकरणी मुख्तार अन्सारीला सर्वात मोठी शिक्षा मिळाली आहे. आजीवन कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. या हत्येप्रकरणी दोन साक्षीदारांनी कोर्टात आपली साक्ष नोंदवली. शिक्षा सुनावल्यानंतर अन्सारीने वयाचा विचार करता शिक्षा कमी करण्याची मागणी केली. अवधेश राय हत्याकांड प्रकरणी कोर्टाने गँगस्टर मुख्तार अन्सारीला दोषी ठरवत तब्बल 32 वर्षांनी शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणात मुख्तार अन्सारीसह पाच जण आरोपी आहेत. मुख्तार अन्सारी, भीम सिंह, कमलेश सिंह, राकेश माजी आमदार अब्दुल कलाम अशी आरोपींची नावे आहेत. दरम्यान या पाच आरोपींपैकी अब्दुल आणि कमलेश यांचा मृत्यू झाला आहे.



अवधेश राय यांची 3 ऑगस्ट 1991 साली करण्यात आली होती. अवधेश राय आपला छोटा भाऊ काँग्रेस नेते अजय राय यांच्या घराबाहेर उभे होते. अचानक एक व्हॅन आली. व्हॅनमधील लोक खाली उतरले आणि त्यांनी गोळीबार केला. काँग्रेस नेते अवधेश राय यांची हत्या वारणसीच्या चेतगंज पोलिस ठाण्याच्या परिसरात झाली. ज्यादिवशी हत्या करण्यात आली त्यादिवशी पाऊस होता. व्हॅनमधून आलेल्या लोकांनी अवधेश राय यांच्यावर गोळ्या झाडल्या. त्यानंतर त्यांना उपचारासाठी जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

कधी कधी फोनवर बोलणारी ती बाई अशा शब्दांची फार गल्लत करते, त्या वेळी असं वाटतं की ही समोर असती तर काही तरी सांगता आलं असतं. आपण एखाद्या व्यक्तीला फोन केला आणि त्या व्यक्तीनं फोन उचलला नाही तर बऱ्याच वेळा असं ऐकायला मिळतं. ' ज्या व्यक्तीला आपण फोन केला आहे, तो व्यक्ती आपला फोन उचलत नाही किंवा उत्तर देत नाही. आता ' व्यक्ती ' हा शब्द सुद्धा स्त्री लिंगीच वापरला जातो. मग ' तो ' व्यक्ती कशाला ? पण जाऊ द्या विषय दुसरीकडेच चालला. आपल्या मूळ विषयाकडे येऊ या.

तर पहाटेचा आणि सकाळचा उल्लेख आधीच्या लेखात आपण पहाट म्हणजे अल्लड तरुणी आणि त्यानंतरची सकाळची वेळ म्हणजे वेणीफणी, गंधपावडर करून आलेली सुस्नात तरुणी असा केला. त्यानंतर जेव्हा सकाळचे अकरा वाजण्याचा सुमार होतो, तेव्हा दुपारचे वेध लागू लागतात. आता सकाळच्या या तरुणीचे रूपांतर तीस चाळीस वर्षांच्या गृहिणीत झालेलं असतं. तिला घरच्यांची काळजी असते. सकाळपासून आपापल्या कामात मग्न असलेल्या आपल्या पतीला, मुलाबाळांना भूक लागली असेल, याची जाणीव होऊन ती स्वयंपाकाला लागलेली असते. दुपारी साडेबारा एकच्या सुमारास ती त्या सगळ्यांना मोठया प्रेमाने बोलावते आणि जेवू घालते. इथे दुपार येते ती आईचे रूप घेऊन. आई जशी आपल्या मुलांची काळजी करते,त्यांना वेळच्या वेळी खाऊपिऊ घालते, तशीच दुपार दमलेल्या, थकलेल्याना चार घास भरवते. आणि चार घास खाल्ल्यावर म्हणते, ' अरे लगेच नको लागूस कामाला. जरा अंमळ विश्रांती घे ना. ' त्या दुपारच्या कुशीत काही क्षण माणसे विश्रांती घेतात, ताजीतवानी होतात आणि पुन्हा आपल्या कामाला लागतात. गाई, गुरं सुद्धा एखाद्या झाडाखाली विश्रांती घेताना दिसतात. सकाळ आणि संध्याकाळ यांच्या मधली वेळ म्हणजे दुपार. शेतकरी, कष्टकरी, मजूर हे सगळे सकाळपासूनच कामाला जुंपलेले असतात.



## आनंदी पहाट

## अर्थकारणाने जीवन उद्ध्वस्त नव्हे, तर उज्ज्वल व्हावे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

बनाव निर्माण करून पैसा मिळवणे हा अलीकडच्या काळात एक नवीन व्यवसायच झाला असल्याचे दिसून येते. पंचतारांकित हॉटेलमध्ये मोफत सेमिनार आयोजित करून हजारो रुपयांचे प्रशिक्षण एका दिवसांत तेही चार तासांत मोफत उपलब्ध करून दिले जाते. सेमिनारच्या अखेरीस मात्र गलेलठ्ठ पॅकेजची ऑफर देऊन धडधडीत फसवणूक करण्यांत येते. पंचतारांकित हॉटेलमध्ये मोफत मिळालेली मेजवानी, तेथील वातावरण, सूट-बूट घालून दिमाखात तारांकित झगमगाटात वावरणारे आयोजकांचे प्रतिनिधी ह्या सर्वांची भुरळ उपस्थितांना पडल्याशिवाय रहात नाही. बनाव रचून होणारी फसवणूक, लुबाडणूक एखाद्या व्यक्तीचे आर्थिक पातळीवरील व्यक्तिगत जीवन उध्वस्त करू शकते. नवीन व्यावसायिक संधी, ट्रेनिंग, व्यवसाय मार्गदर्शन अशा प्रकारचे सेमिनार आयोजित होत असल्याचे आपल्यापैकी प्रत्येकाने विशेषतः समाज माध्यमातून पाहिले असेल. ह्या जगात मोफत काहीच मिळत नसते, हे माहिती असूनही काहीजण अशा सेमिनारला आवर्जून उपस्थित राहतात, बनावाला बळी पडतात, कालांतराने पस्तावतात नंतर धास्तावतात. नव्याने होणाऱ्या परिचयांतून अनेकदा नवनव्या संकल्पना उदयास येऊ लागतात. त्यांतून नवे ग्रुप तयार होतात. त्या ग्रुपच्या माध्यमातून व्यावसायिक चर्चा घडायला सुरुवात होते. प्रत्येकाचा एक सामायिक हेतू असतो, व्यवसायाच्या माध्यमातून अर्थार्जन करणे. त्यांतील एक-दोघे जास्तच हुशार, तयारीचे, पट्टीचे असतात. त्याच्यापुढे आपली तिजोरी उघडी करणाऱ्यांच्या उणिवा त्या हुशारांना कळलेल्या असतात. त्याचाच फायदा घेऊन, खोटा वायदा करून, कायद्याला न जुमानता, भागीदारी तत्वावर आर्थिक व्यवहार सुरु होतात. त्यांच्या दृष्टीकोनातून भागीदारी ह्या शब्दाचा अर्थ नेमका काय आहे, हे इतरांना कालांतराने समजते.



आधुनिक केसरी

## झालो मी पावन | दास तुझा ||

देहाच्या गाभारी | आत्म्याचे भजन ||
राहो अधिष्ठान | सत्कर्माचे ||१||
श्वासाचिया संगे | घ्यावे हरिनाम ||
व्हावे निजधाम | विठ्ठल तो ||२||
विणेतूनी यावा | बोल अमृताचा ||
सात्विक टाळांचा | नादब्रह्म ||३||
नसावा प्रमाद | अहंकार जीवा ||
अखंड नांदावा | स्थितप्रज्ञ ||४||
तुझ्या कृपा दाने | लाभले जीवन ||
झालो मी पावन | दास तुझा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

नासिकाग्रं च दृष्ट्वा ते स्मर्यते
बाण एव हि |
तापत्रयविनाशाय दुर्गां
देवीं नमाम्यहम् || १४ ||

तुझे नासिकाग्र म्हणजे नाकाचे टोक पाहून बाणांचे स्मरण होते, अशा तुला दुर्गा देवीला तीनही तापांच्या शांतीसाठी मी नमन करतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

सत्संगति सद्गुरु शरण,
सेवा भाव विचार ।
ऊपकार गुरु पाठ है, यह विकर्म जगसार
।।५८।।(स्वर्वेद पंचम मण्डल द्वादश अध्याय) ०५/१२/५८

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
सत्संगती, सद्गुरू-शरण, सेवाभाव, उपकार, गुरूंची शिक्षा ( साधना ) ही विकर्मं आहेत, जी या भवसागर-निवृत्ती साठी महान साधनं आहेत.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## सुक्ष्म आशंकानिरूपण

आधुनिक केसरी



आकाश वायु ही तत्वे मूळमायेमध्ये असली पाहिजेत. "ओंकार" शब्द हा आकाशाचा गुण म्हणून ओंकार( अहं ) हे स्फुरण नादरूपाने प्रगट झाले. वहाणे पसरणे हा वायूचा गुण पण हा गुण जीवाला बोचत नाही तो मुलायम कोमल आहे. मी एकच आहे अनेक व्हावे ही मनाची धारणा झाली. बल हा तेजाचा गुण आहे.जडत्व हा विश्वाचा गुण आहे. ही पंचमहाभूते अव्यक्त असताना काय किंवा व्यक्त असताना काय एकमेकापासून अलग राहू शकत नाहीत. ती एकरूप झालेली असतात. विश्वरचना अशा प्रकारे अनेकदा विचार करायला लावणारी आहे. स्वर्ग,नरक,जन्ममरण, पाताळ,किंवा जे चराचर पंचमहाभूतांनी बनलेले आहे. त्याचा शेवट हा निश्चितच आहे. तो निसर्ग नियम आहे. आरंभ व शेवट हा परमात्मा स्वरूप आहे. आणि तेच खरं तर सत्य आहे. यावर अजूनही बरेच विवेचन करता येईल पण अनेक महिला मंडळांनी व विद्यार्थ्यांनी पण आम्हाला थोडक्यात विवेचन भावते असे सांगितले त्यांच्या सुचनेला मान देऊन आता थांबूया.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## शुद्ध वातावरण व पवित्र आचरण

आधुनिक केसरी

आपल्या घरातले वातावरण शुद्ध, शांत आणि पवित्र असावे. आपल्याकडे येणाऱ्या माणसाला परत जाऊच नये असे वाटावे. अगदी भगवंताच्या इच्छेने प्रपंच चालला आहे असे समजून, त्य प्रपंचात विद्या, वैभव, घरदार इत्यादि सर्व काही यश संपादन करा; अगदी एखाद्या राजयोग्याप्रमाणे प्रपंचात ऐष आरामात राहून गाद्यागिरद्यांवर लोळा; पण हे करीत असताना तुमचे अंतःकरण मात्र भगवंताच्या प्रेमाने ओथंबलेले राहू द्या. कोणाशी वाद घालीत बसू नका. जगाचा मान फार घातक आहे. त्याची चटक लागली की मनुष्य त्याच्या मागे लागतो, नंतर मान मिळविण्याची कृती थांबते आणि मानही नाहीसा होतो. जगातले अजिंक्य पुरुषसुद्धा कुठेतरी विषयात गुंतलेले असतात, तिथे त्यांचा घात होतो. जगाला ते भारी असतील, पण त्या विषयापुढे त्यांचे काहीच चालत नाही. प्रेमात गुंतू नका, तसे द्वेष मत्सरांतही गुंतू नका; दोन्ही सारखेच घातक आहेत. आपला प्रिय नातेवाईक मेला, आणि आपण ज्याच्यावर दावा लावला आहे तो भाऊबंद मेला; दोघेही मेल्याचे सुतक सारखेच ! त्याचप्रमाणे, मनुष्य



प्रेमाने गुंतला काय आणि द्वेषाने गुंतला काय, नुकसान सारखेच होते. भगवंताचा विसर हा कोणत्यही कारणाने झाला तरी बरा नाही; मग प्रपंचात सुखसोयी असल्याने तो होवो किंवा प्रपंचात दुःख झाल्यामुळे होवो. ढोंग, बुवाबाजी, इत्यादींच्या भानगडीत तुम्ही पडू नका. अगदी काहीही न केलेत तरी चालेल, पण ढोंग मुळीच करू नका. आणि सर्वांनी माझ्यावर कृपा करा, अगदी अनुभवाने मी सांगतो, की बुवा होण्याच्या फंदात तुम्ही पडू नका. आपले कर्तव्य भगवंताच्या स्मरणात करून, त्याचे अनुसंधान अखंड टिकू द्या. आमची अशी वृत्ती बनण्यासाठी संतांच्या संगतीची आपल्याला जरूरी आहे. आपण सर्वजण सत्संगतीमध्ये आहोत असे म्हणतो, मग आमची वृत्ती का न सुधारावी ? तर संतांना ज्याची आवड आहे ते आम्ही धरले नाही, म्हणून आमची वृत्ती सुधारत नाही. श्रीकृष्णाने उद्धवाला ज्ञान देऊन त्याला गोपींकडे पाठविले. भगवंताच्या नामामध्ये त्या रंगून गेल्या होत्या. गोपींचे नामावरचे प्रेम पाहून उद्धवाला आश्चर्य वाटले. नामामध्ये त्यांना भगवंत दिसत असे; ते पाहून उद्धवाने देवाला सांगितले, "देवा, तू मला ज्ञान दिलेस खरे, पण तुझ्या भक्तीचे प्रेम त्याहून श्रेष्ठ आहे, ते तू मला दे." खरोखर, त्या नामाचे माहात्म्य देवाच्या वर्णनापेक्षाही कठीण आहे. तुम्ही सर्वजण इथे आला आहात; इथून रामाजवळून काही मागून न्यायचे असेल तर त्या नामाचे प्रेम तुम्ही सर्वांनी मागा. सर्वांनी नामस्मरण करा आणि आनंदात राहा. राम कृपा करील, हा भरवसा बाळगा.

१२९. आपल्या जीवनात सहजता हवी. सहजतेमध्ये समाधान आहे.

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

यस्तु संचरते देशान् यस्तु सेवेत पण्डितान् ।
तस्य विस्तारिता बुद्धिस्तैलबिन्दुरिवाम्भसि ॥

स्पष्टीकरण- देशपर्यटन हे केवळ हौसे-मौजेसाठीच नव्हे तर बुद्धीच्या वाढीसाठीही आवश्यक असते. जग हा एक उघडा ग्रंथ आहे. तो डोळयांनी जेवढा वाचाल आणि कानांनी जेवढा ऐकाल तेवढी तुमच्या ज्ञानात भर पडेल. आणि पंडितांचा सहवास कशासाठी करायचा ? तर विद्वान लोक सहजगत्या जे बोलून जातात, त्यातून आपल्या बुद्धीला चालना मिळते, म्हणून.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, ६ जून २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari



# डॉ. पाटील यांना राष्ट्रीय शिक्षारत्न पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** रियल इंडो ग्लोबल व्हिजन सोशल डेव्हलपमेंट गुरुकुल संस्थेच्या वतीने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना दिला जाणारा राष्ट्रीय शिक्षा रत्न पुरस्कार २०२३ हा क्रांतिवीर नवलभाऊ कला महाविद्यालय नवलनगर येथील इतिहास विषयाचे वरिष्ठ प्राध्यापक व मार्गदर्शक डॉ. संजय जिभाऊ पाटील यांना राष्ट्रीय शिक्षा रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. संशोधन, सांस्कृतिक, शैक्षणिक, पर्यावरण, सामाजिक क्षेत्रात, राष्ट्रीय स्तरावरील क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. नूतन मराठा महाविद्यालय जळगाव येथे सदर पुरस्कार वितरण कार्यक्रम संपन्न झाला. राष्ट्रीय शिक्षा रत्न पुरस्कार समितीचे अध्यक्ष तथा प्राचार्य डॉ मनोहर पाटील अध्यक्षस्थानी होते श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. एस टी पाटील यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप रामू पाटील, विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना संचालक प्राध्यापक डॉ सचिन नांद्रे, नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठातील डॉ. सूर्यकांत थोरात, प्राचार्य डॉ देशमुख, प्राचार्य डॉ महेंद्र सूर्यवंशी, प्राचार्य डॉ. प्रमोद पवार, प्राचार्य डॉ आर एस पाटील, प्राचार्य डॉ राजेंद्र आहिरे, डॉ संजय शिंगाणे, गुरुकुल फाउंडेशनचे अध्यक्ष प्राध्यापक डॉ संभाजी पाटील, प्राध्यापक डॉ मोहन पावरा आदी उपस्थित होते त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल ग्राम विकास मंडळ नवनगर संचालित क्रांतिवीर नवलभाऊ कला महाविद्यालय नवलनगर अध्यक्ष नानासो विजय नवल पाटील, सिनेट सदस्य एसएनडिटी महिला विद्यापीठ मुंबई बाळासाहेब अनिकेत पाटील आणि प्राचार्य डॉ. विजय उभाळे सहकारी प्राध्यापक व कर्मचारी यांनी डॉ. संजय पाटील यांच्या यशाबद्दल हार्दिक अभिनंदन केले.

# नाशिक जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह पावसाचा तडाखा

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** रविवारी दुपारी वादळी वाऱ्यासह झालेल्या मान्सूनपूर्व पावसाने जिल्ह्यातील अनेक भागांना तडाखा दिला. शहर व ग्रामीण भागात झाडांची पडझड झाली. वादळात कुक्कुटपालन केंद्र, काही घरांवरील पत्रे उडून नुकसान झाले. मनमाडसह अनेक ठिकाणी कित्येक तास वीजपुरवठा खंडित झाला. झाडांवरील कैऱ्या, चाळीतील कांद्याचे नुकसान झाले. सुरगाण्यातील हतगड येथे रविवारी सायंकाळी विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित शेतकरी मेळाव्यासाठी उभारण्यात आलेला मंडपही वादळात कार्यक्रमाआधीच जमीनदोस्त झाला. आठवडाभरापासून जिल्ह्यात उन्हाच्या तीव्र झळा जाणवत असून प्रचंड उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत. या वातावरणात रविवारी बदल झाले. सकाळपासून अनेक भागांत ढगाळ वातावरण झाले. नाशिक शहरासह जिल्ह्यात दुपारी वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. अकस्मात आलेल्या पावसाने नागरिकांची तारांबळ उडाली. द्वारका, वडाळा भागात झाड कोसळले. यात जीवितहानी झाली नसली तरी दुचाकीचे नुकसान झाल्याचे अग्निशमन दलाकडून सांगण्यात आले. गोदाकाठी उभारलेला मंडपही कोसळला. त्र्यंबकेश्वर तालुक्यात पावसाचा अधिक जोर होता. हरसूलच्या दाणवेश्वर परिसरात दोन तास पाऊस झाला. शेतांमध्ये पाणी साचले. जनावरांची ऐरण पाण्यात गेली. वादळी वारा व पावसाने ग्रामीण भागात छप्पर दुरुस्ती करण्यात अडचणी येत आहेत. पावसाने त्र्यंबकेश्वरमध्ये भाविकांची तारांबळ उडवली. त्र्यंबक राजाच्या दर्शनासाठी रविवारी तुलनेत अधिक गर्दी असते. दर्शन रांगेत तीन, चार तास प्रतीक्षा करावी लागते. या भागात अर्धा ते पाऊण तास पाऊस झाला. दिंडोरी तालुक्यात वादळी वाऱ्याने कांद्याचे नुकसान झाले. बहुतांश शेतकऱ्यांनी उन्हाळ कांदा चाळीत साठविलेला आहे. वादळात काही ठिकाणी पत्रे उडून गेल्याने पावसाने कांदे भिजले. मनमाड, येवला व नांदगाव भागात वेगळी स्थिती नव्हती. मालेगाव आणि बागलाण तालुक्यात पावसापेक्षा वादळी वाऱ्यामुळे अधिक नुकसान झाले. मालेगाव तालुक्यातील दाभाडी, पिंपळगाव, रावळगाव या भागात वादळी वाऱ्यामुळे सर्वत्र धुळीचे साम्राज्य पसरले होते. धुळीमुळे वाहने चालविणे अवघड झाल्याने चालकांनी वाहने सुरक्षितस्थळी उभी केली. रामपुरा भागात कुक्कुटपालन केंद्राचे पत्रे उडून नुकसान झाले.

# २०० झोपड्यांवर रेल्वेचा हातोडा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** रेल्वेच्या जागांवर अतिक्रमण दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. रेल्वेला भविष्यात नवीन प्रकल्प राबविताना यामुळे अनेक अडचणी येतात. या पार्श्वभूमीवर रेल्वेने आता अतिक्रमणविरोधी धडक कारवाई सुरू केली आहे. शिवाजीनगर ते खडकी रेल्वे स्थानकांदरम्यानच्या अतिक्रमणांवर रेल्वेने हातोडा मारला आहे. शिवाजीनगर ते खडकी स्थानकांदरम्यान रेल्वेच्या जागेवर अतिक्रमण करण्यात आले होते. या ठिकाणी नागरिकांनी झोपड्या उभारल्या होत्या. रेल्वेने हे अतिक्रमण हटवण्यासाठी धडक कारवाई केली. या कारवाईत रेल्वेचा अभियांत्रिकी विभाग, रेल्वे सुरक्षा दल, लोहमार्ग पोलीस दल आणि स्थानक पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश होता. रेल्वेचे ५० गँगमन, रेल्वे सुरक्षा दल, लोहमार्ग पोलीस आणि स्थानिक पोलिसांच्या ३० कर्मचाऱ्यांनी चार जेसीबी यंत्रांच्या सहाय्याने ही कारवाई केली. शिवाजीनगर ते खडकी रेल्वे स्थानकांदरम्यान रेल्वेच्या जागेवर अतिक्रमण करून बांधलेल्या सुमारे १५० ते २०० झोपड्या हटवण्यात आल्या. यातून रेल्वेने अतिक्रमण झालेली ५५०x२० मीटर जागा पुन्हा ताब्यात घेतली आहे. या जागेचे बाजारमूल्य सुमारे पाच कोटी रुपये आहे. रेल्वेच्या जागेवर अतिक्रमण होऊ नये, यासाठी यापुढेही सातत्याने अतिक्रमण कारवाई केली जाणार आहे, अशी माहिती रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिली.

पुण्यात अनधिकृत



# एकनाथ खडसे यांनी पुन्हा भाजपमध्ये यावे; विनोद तावडे यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** एकनाथ खडसे यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याने पुन्हा भाजपमध्ये यावे, असे आवाहन राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी रविवारी केले. त्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून उलटसुलट चर्चेला सुरुवात झाली आहे. खडसे यांना ग्रामीण महाराष्ट्राची चांगली जाण असून त्यांच्यासारखा नेता भाजपमध्ये असावा, असे मत तावडे यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना व्यक्त केले. यासंदर्भात खडसे यांच्याशी किंवा पक्षश्रेष्ठींशी माझे बोलणे झालेले नाही किंवा त्यांना प्रस्ताव दिलेला नाही, असे तावडे यांनी स्पष्ट केले. उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी खटके उडाल्याने व संघर्षांमुळे नाराज झालेल्या खडसे यांनी भाजपला सोडचिठ्ठी दिली होती. खडसे यांनी भाजपमध्ये असताना आणि पक्ष सोडल्यानंतर अनेकदा फडणवीस यांच्यावर जाहीर टीका केली आहे. खडसे यांची पुण्यातील भोसरी येथील जमीन गैरव्यवहाराची चौकशी प्रलंबित असून जावई गेले दोन वर्षे तुरुंगात आहे. तरीही खडसे यांनी स्वगृही यावे, असे मत व्यक्त केल्याने त्याबाबत चर्चा सुरू झाली आहे. कर्नाटक विधानसभा निवडणुकीत माजी मुख्यमंत्री येडीयुरप्पा यांना प्रचारापासून बाजूला



ठेवल्याने त्याचा भाजपला काही अंशी फटका बसला. पराभवानंतर भाजपने आत्मचिंतन सुरू केले असून पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा व विधानसभा निवडणुका लक्षात घेता ज्येष्ठ नेत्यांची नाराजी दूर करण्याचेही प्रयत्न सुरू केले असल्याचे सूत्रांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर, खडसे यांची भाजपमध्ये येण्याची इच्छा असेल, तर फडणवीस हे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि स्थानिक नेत्यांशी चर्चा करून उचित निर्णय घेतील.

# चार वाहने एकमेकांवर आदळली, दोन ठार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** आग्रा महामार्गावर नवीन कसारा घाटात आज (4 जून) पहाटेच्या सुमारास भीषण अपघात झाला आहे. या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. जखमीला इगतपुरीच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्याचबरोबर अनेक कोंबड्याही या मरण पावल्या असून अपघातानंतर रस्त्यावर कोंबड्यांचा खच दिसून आला. दरम्यान या अपघाताचे कारण समजू शकले नाही.

नाशिक-मुंबई महामार्गावर नवीन कसारा घाटात पहाटेच्या सुमारास भीषण अपघाताची घटना घडली. या भीषण अपघातात अपघातात दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. चार वाहनांमध्ये हा विचित्र अपघात झाला असून दोघा जणांना जीव गमवावा लागला आहे. यातील अपघातग्रस्त वाहनामध्ये कोंबड्याची वाहतूक सुरु होती. मात्र अपघातात वाहनाचा चक्काचूर झाल्याने अनेक कोंबड्या मरण पावल्या आहेत. त्यामुळे कसारा घाटात कोंबड्यांचा खच दिसून आला. आयशर, छोटा हत्ती आणि दोन पिकअप वाहनांमध्ये हा विचित्र अपघात झाला. यात दोन जणांचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे.



## खरगेंचे मोदींना पत्र

आधुनिक केसरी

ओडिशा रेल्वे अपघातानंतर अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. सर्वाधिक सुरक्षित प्रवास समजला जाणाऱ्या रेल्वे प्रवासातच सर्वाधिक बळी गेल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. विरोधकांनी या मुद्द्यावरून सत्ताधाऱ्यांना घेरले आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून अनेक प्रश्न विचारले आहेत. तसेच, त्यांच्या याप्रकरणी सीबीआयला तपासाचे आदेश दिल्याने टीकाही केली आहे. हे प्रकरण सीबीआयकडे वर्ग करण्यात आले आहे. यावरून मल्लिकार्जुन खरगे यांनी विरोध केला आहे. सीबीआय गुन्ह्यांचा तपास करण्याकरता आहे, रेल्वे अपघाताची चौकशी करण्याकरता नाही. सीबीआय किंवा इतर कोणीतीही कायदा अंमलबजावणी संस्था, तांत्रिक, संस्थापक आणि राजकीय अपयशांसाठी जबाबदारी निश्चित करू शकत नाही. त्यांच्याकडे रेल्वे सुरक्षा, सिग्नलिंग आणि देखभाल पद्धतींमध्ये तांत्रिक कौशल्याचा अभाव असेल, असे खरगे यांनी म्हटले आहे. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना चार पानी पत्र लिहिले आहे. या प्रकरणाची जबाबदारी कोणीही उचलायला तयार नाही, अशी टीकाही त्यांनी केली. रेल्वेमंत्र्यांनी या अपघातामागचे कारण शोधले आहे, तरीही त्यांनी हे प्रकरण सीबीआयला तपासासाठी दिले आहे, असेही खरगे म्हणाले. २०१६ मध्ये कानपूरमध्ये भीषण रेल्वे अपघात झाला होता. या अपघातात १५० लोकांचा मृत्यू झाला होता. तेव्हा तत्कालीन रेल्वे मंत्र्यांनी राष्ट्रीय तपास यंत्रणेला याबाबत चौकशीचे आदेश दिले होते, अशी आठवणही खरगे यांनी करून दिली. या अपघातावरून मोदींनी २०१७ च्या निवडणूक रॅलीत देशाला आश्वासन दिले होते की दोषीला कठोरातील कठोर शिक्षा सुनावली जाईल. परंतु, २०१८ मध्ये एनआयएने तपास बंद केल आणि आरोपपत्र दाखल करण्यास नकार दिला. याप्रकरणातील दोषी अद्यापही उजेडात आलेले नाहीत. १५० मृत्यूंना कोण जबाबदार आहे? असा सवालही त्यांनी पत्राद्वारे केला आहे. खरगे म्हणाले की, "ओडिशातील रेल्वे अपघात हा सर्वांचेच डोळे उघडणारा होता. रेल्वेमंत्र्यांचे सुरक्षेचे पोकळ दावे आता उघड झाले आहेत. या सुरक्षेबाबत सर्वसामान्य प्रवाशांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. त्यामुळे या भीषण अपघाताची खरी कारणे शोधून समोर आणणे सरकारचे कर्तव्य आहे. आज, आमच्या प्रवाशांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी आणि बालासोरसारख्या अपघाताची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी सर्व रेल्वे मार्गांवर अनिवार्य सुरक्षा मानके आणि उपकरणे बसवण्याला प्राधान्य देणे हे सर्वात महत्त्वाचे पाऊल आहे, असेही ते म्हणाले. खरगे पुढे म्हणाले, रेल्वे अधिक प्रभावी, अधिक प्रगत आणि अधिक कार्यक्षम बनवण्याऐवजी, तिला सावत्र आईसारखी वागणूक दिली जात आहे. दरम्यान, सततच्या सदोष निर्णयामुळे रेल्वेचा प्रवास असुरक्षित झाला आहे आणि त्यामुळे आमच्या लोकांच्या समस्या वाढल्या आहेत, ते म्हणाले.

## शिकायचे कशासाठी- हे समजणे खरे आव्हान !



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**येत्या शतकात शिकविण्याची नव्हे तर शिकण्या संबंधी जी आव्हाने आहेत त्यांचा विचार भविष्याच्या दृष्टीने करणे गरजेचे आहे. आपली सर्व शिक्षण व्यवस्था टीचिंगचाच विचार करते. सगळा भर अभ्यासक्रम पूर्ण करण्यावर असतो. विद्यार्थी काय किती शिकला याचा फारसा विचार नसतो. ज्या परीक्षाद्वारे हे मुल्य मापन होते त्याही कुच कामाच्या ठरत आहेत.या संदर्भात २०२०चे फिजिक्स विषयाचे नोबेल पुरस्कार विजेते प्रा कार्ल वीमन यांचे विचार मोलाचे ठरतात. २०२०साली पुरस्कार स्वीकारल्या नंतर नोबेल वीक डायलॉग या कार्यक्रमात त्यांनी आपले मत विस्ताराने मांडले आहे.**

Challenges of learning म्हणजे शीकण्या संबंधीची आव्हाने हा त्यांच्या संवादाचा विषय आहे.

प्रावीमन हे स्टॅनफोर्ड विद्यापीठात फिजिक्स विभागात काम करतात.पण ते जोडीने तिथेच शिक्षण विभागात देखील संशोधन करतात. आपल्या कडे असे आंतर शाखीय संशोधन फार कमी दिसते. कारण आपण विद्यापीठात एका विभागाला दुसऱ्या विभागा पासून भिंती बांधून विलग केले.आपण पूल नाही बांधले. त्यामुळे आंतर शाखीय देवाण घेवाण आपल्याकडे कमीच. टीचिंग अँड लर्निंग इन सायन्स अँड इंजिनियरिंग इन हायर एजुकेशन हा या नोबेल विजेत्यांचा अभ्यासाचा, संशोधनाचा विषय आहे.

विज्ञान क्षेत्रात तज्ज्ञ कसे तयार होतात, मुळात तज्ज्ञकुणाला म्हणायचे, उत्तम शास्त्रज्ञ कोण,नोबेल विजेते कसे घडतात,अशा विषयाचा यांनी सखोल अभ्यास केला. त्यांचे निष्कर्ष महत्वाचे,अन् मजेशीर आहेत. शास्त्र, विज्ञान समजून घेणे खूप कठीण नाही.पण ते तितके सोपे देखील नाही! ते तुम्हाला कोण, कसे शिकवतो, समजावतो यावर सारे काही अवलंबुन असते. शिकणे याचा अर्थ पुस्तकातून माहिती गोळा करणे, दिलेला अभ्यासक्रम पूर्ण करणे हा नव्हे! परीक्षे साठी, गुणा साठी, पदवी साठी ते ठीक आहे. पण जोपर्यंत त्या ज्ञानाचा उपयोग काय,ते व्यवहारात वापरायचे कसे,एखादी नवी समस्या सोडविण्या साठी उपयोगात आणायचे कसे हे आपल्याला कळत नाही,तोपर्यंत त्या शिक्षणाला काही अर्थ नाही. आपण शिकलेल्या गोष्टीचा आपण नवी समस्या सोडविण्यासाठी, चांगले समाजाच्या हितकारक निर्णय घेण्या साठी उपयोग करायला शिकत नाही तोपर्यंत आपण स्वतःला तज्ज्ञ म्हणू शकत नाही. शिक्षणाचे खरे मूल्य,आपण आयुष्यात चांगले,समाजाच्या हिताचे निर्णय घेण्या साठी त्याचा उपयोग कसा करतो, यावरून ठरते! आपण शिकलेले, ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान आपण समाजाचे भविष्य अधिक चांगले, उत्तम करण्यासाठी कसे उपयोगात आणतो,यावरून आपली क्षमता, योग्यता, प्रावीण्य ठरत असते. बाकी, परीक्षेत ले गुण, आपल्या पदव्या ची नामावली, आपल्याला मिळालेल्या श्रेणी हे सारे दुय्यम ठरते! विज्ञान म्हणजे समाजात आहे त्यात सुधारणा,जीवनमानाचा स्तर उंचावण्यासाठी प्रयत्न.

मेडिकल क्षेत्राचे उदाहरण देऊन हे समजावता येईल. शंभर वर्षापूर्वी डॉक्टर चे ज्ञान,डायग्नोसिसिस ची,तपासणी ची साधने, यंत्रणा याला मर्यादा होत्या. आता मेडिकल च्या सर्व क्षेत्रात झालेली प्रगती ही विज्ञान तंत्रज्ञान ची देण आहे. तपासणी यंत्रणा बदलली आहे. शस्त्र क्रियेसाठी आधुनिक यंत्रणा आली आहे. त्यामुळे निदान,उपचार करण्यात गती आली आहे.



उपचार वेदना दायी राहिले नाहीत. ते अधिक सुसह्य झाले आहेत. मोबाईल, इंटरनेट, कम्युनिकेशन अशा सर्व क्षेत्रात विज्ञानाने लक्षणीय भरारी घेतली आहे. पण इथे शास्त्रज्ञाचे विवेकी निर्णय महत्वाचे ठरतात. मायक्रोवेव्ह फ्रिकवेंसी चा शोध दुसऱ्या महायुध्दाच्या वेळी शत्रूच्या विमानाचा विध्वंस करणाऱ्या रडार यंत्रणेसाठी झाला. आज मायक्रोवेव्ह आपल्या स्वयंपाक घरात आहे कुकिंगसाठी. बेडरूममध्ये आहे मनोरंजनासाठी. एव्हढेच काय याच मायक्रोवेव्ह चा उपयोग पोटातील ट्यूमर शोधण्यासाठी, किंवा आतल्या दुखापती ला रेडिएशन हिटिंग ने बरेकरण्यासाठी देखीलहोतो. आपण जे शिकतो त्याज्ञान विज्ञाना चा उपयोग समाजाच्या हितासाठी, चांगल्यासाठी कसा करायचा यासाठी ही उदाहरणे बोलकी आहेत. शास्त्रज्ञाने स्वतःलाच प्रश्न विचारायला हवाःया प्रयोगाने,संशोधनाने समाजाचे कोणते प्रश्न, कसे सुटतील ? मी हा प्रॉब्लेम सोडविल्याने ज्ञान विज्ञानात कोणती भर पडेल ? माझे योगदान समाजाच्या कोणत्या क्षेत्रात,कोणाच्या कामी येईल ? या विचार सरणी चे संवर्धन म्हणजे खरे शिक्षण.

आता शिक्षका पुढे आव्हान हे असते, असणार की विद्यार्थ्यांच्या गळी हे उतरवायचे कसे ?शिकायला आलेला विद्यार्थी इतक्या दूरचा, आदर्श विचार करीत नाही.त्याला पुस्तकातील माहिती समजली की पुरे!ती देखील परीक्षेत उत्तरे लिहिण्या पुरती.गुण, पदवी मिळवण्या पुरती. अन् त्या भरवशावर चांगली म्हणजे उत्तम कमाई ची नोकरी मिळविण्या पुरती! मुलांना या संकुचित मनो वृत्तीतून बाहेर काढणे,त्याला शिक्षणाचे खरे उद्दिष्ट समजावत वेगळ्या स्तरावर, उंचीवर नेणे हे खऱ्या शिक्षकापुढे मोठे आव्हान असणार आहे.

याबाबतीत आणखीन एक गैर समज आहे. विज्ञान, तंत्रज्ञान हे क्षेत्र म्हणजे बुध्दीवंताची मक्तेदारी!ते सामन्याचे काम नव्हे. त्यांनी आर्ट्स कडे जावे. हे पूर्ण चुकीचे आहे. विज्ञानाची दारे सर्वासाठी खुली आहेत.अनेक यशस्वी शास्त्रज्ञ,नोबेल विजेते यांचे आयुष्य तपासले तर अनेक सामान्य परिस्थितीतून वर आले आहेत. त्यांची कौटुंबिक, सामाजिक पार्श्वभूमी देखील सर्व साधारण स्तराची आहे. चांगला शिक्षक विद्यार्थ्यांना हा मेसेज देतो की तुमची गरिबी,तुमची सामाजिक परिस्थिती तुमच्या विद्वत्तेच्या आड येत नाही. तुमची गुणवत्ता ठरवीत नाही. तुमच्यात योग्य स्किल, मनोवृत्ती,जबर आकांक्षा, जिद्द, असेल, धाडस असेल तर कोणत्याही विषयाचे शिखर गाठण्यापासून तुम्हाला कुणीच रोकू शकत नाही. आता तर आधुनिक तंत्रज्ञानाने नवी दारे उघडली आहेत. त्यासाठी नव्या सुविधा देखील निर्माण केल्या आहेत.क्लिष्ट विषयदेखील समजणे सोपे झाले आहे. तशी साधने घर बसल्या उपलब्ध आहेत. शिक्षकाने शिकवल्या नंतर स्वयं प्रयत्नाने, स्वाध्यायाने बरेच काही शिकणे सोपे झाले आहे. पण त्यासाठी प्रा वीमन म्हणतात त्या प्रमाणे शिक्षणाचा मूळ उद्देश समजून घेणे विद्यार्थी अन् प्राध्यापक दोघानाही गरजेचे आहे.कशासाठी शिकायचे हे शिकले, शिकवले की पुढे गगन ठेंगणे असे म्हणायला हरकत नाही.

## जागतिक पर्यावरण दिन



माधव बैलकवाड
संपर्क 9545013082

आधुनिक केसरी

**५ जूनहा दिवस जगभरात जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. मागील दोन अडीच शतकात विशेषतः औद्योगिक क्रांती नंतर जागतिक हवामान बदल आणि इतर नुकसानकारक बदल लक्षात घेता पृथ्वीचे आयुर्मान, सहज, स्वाभाविक आणि निसर्गनियमानुसार असावे या उद्देशाने संयुक्त राष्ट्र संघात ( युनो ) ५ ते १५ जून १९७२ दरम्यान एक संमेलन झाले. यात संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम यावर सखोल चर्चा केली. त्यात मानवी हस्तक्षेपामुळे पर्यावरणाचे होत असलेले नुकसान आणि त्याचा मानवी जीवनावर होणारे विपरीत परिणाम यावर सखोल चर्चा होऊन काहीतरी गंभीर पावले उचलली पाहिजे यावर एकमत झाले.**

याच संमेलनात संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम United Nations Environment Program ( UNEP ) चा जन्म होऊन दरवर्षी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करण्याचे ठरवण्यात आले, यामुळे लोकं, सरकार आणि समाजात पर्यावरण विषयक जनजागृती करता येईल. याच संमेलनात भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पर्यावरणाची बिघडती जागतिक परिस्थिती आणि त्याचा जगाच्या भविष्यावर होणारा प्रभाव या विषयावर प्रभावी भाषण दिले आणि समतोल पर्यावरणाचे महत्व विशद केले. आंतरराष्ट्रीय पर्यावरण विषयक स्तरावर हे भारत सरकारचे पहिले महत्वाचे पाऊल होते. पुढील वर्षी म्हणजे १९७३ मध्ये धरती हा विषय घेऊन मोजक्या संकल्पनेसहित हा दिवस साजरा करण्यात आला. १९७४ मध्ये जगातील विविध शहरात हा दिवस अत्यंत उत्साहाने साजरा करणे सुरू झाले आणि तिथून पुढे संपूर्ण जगभर दरवर्षी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून संपूर्ण आत्मीयतेने साजरा केला जातो. दरवर्षी सुमारे १५० देश हा दिवस साजरा करतात आणि दरवर्षी वेगळा देश हा उपक्रम जागतिक स्तरावर होस्ट करतो. जागतिक परिस्थिती, अन्न, पाणी, दुष्काळ, तापमान वाढ, हवामान बदल आणि त्याचे विपरीत परिणाम, मानवी जीवन आणि भविष्य, या सर्वांवर जनजागृती म्हणून हा दिवस साजरा केला जातो. त्यासाठी दरवर्षी एक नवी थीम निवडून त्यासंदर्भात कार्य केले जाते. त्यासाठी मग विविध देशानी पर्यावरण संबंधित पशु, पक्षी प्राणी आणि जंगल संवर्धन करण्यासाठी वेगवेगळे कायदे केले. २०२० साली कोलंबियाने या दिवसाचे आयोजन केले होते. २०२१ साली पाकिस्तान या जीवन परिवर्तन उपक्रमाचे यजमान होते . गतवर्षी म्हणजे २०२२ साली स्वीडन हा देश या दिवसाचा आयोजक होता. फक्त आणि फक्त पृथ्वी ही गतवर्षीची थीम होती. यावर्षी म्हणजे २०२३ साली आयव्हरी कोस्ट हा देश या दिवसाचा आयोजक असून प्लास्टिक प्रदूषणावर उपाय ही यावर्षीची थीम आहे. या दिवशी विविध देशांमध्ये अंतर्गत परिस्थितीत पर्यावरणविषयी होणाऱ्या दुष्परिणामांची जाणीव करून दिली जाणार आहे. २०२० आणि २०२१ साली जगावर कोरोना महामारीचे संकट असल्याने हा कार्यक्रम सार्वजनिकरित्या साजरा न करता ऑनलाइन साजरा केला गेला. जगभरातील लोकांनी या दिवशी पर्यावरणाचे जतन करुन मानवी भविष्य सुरक्षित करण्याचा संकल्प केल्यास या दिवसाचे सार्थक होईल. जागतिक पर्यावरण दिनाच्या सर्वांना शुभेच्छा!



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# भल्या पहाटे आष्टी पोलिसांची धडाकेबाज कारवाई

## पिकअपसह तीन लाख ३६ हजार नऊशेचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** तालुक्यातील आष्टी पोलीस ठाण्याच्या हद्दीत सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध धंदे व देशी विदेशी दारूची विक्री व चोरटी वाहतुकीवर आष्टी पोलीसांच्या कारवाई सुरूच आहे. त्यातच दि ४ जून रोजी पहाटे पाच वाजता पोलिसांच्या गुडमॉर्निंग पथकाने अवैध देशी विदेशी दारूची चोरट्या मार्गाने वाहतूक करणारे पिकप भल्या पहाटे पाच वाजता पोलीसांनी पकडून कारवाई केली आहे. एका जणास ताब्यात घेत पिकप सह देशी विदेशी दारूचे बॉक्स असा 3 लाख 36900 रूपयांचा मुद्देमाल पोलीसांनी जप्त केला आहे. रविवारी सकाळी पाच वाजेच्या सुमारास आष्टी पोलीस ठाण्याचे गुडमॉर्निंग पथक गस्तीवर असतांना पांडेपोखरी कडून सूरुमगाव पाटीकडे रस्त्याने पिकप क्रमांक एम एच 21 बी एच 5217 मधून देशी विदेशी दारुची चोरटी वाहतूक होत असल्याची माहिती पथकाला मिळाली. असता सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके यांच्यासह सदरील पथकाने पांडेपोखरी येथे पिकप ला थांबवून झडती घेतली असता त्यात 36 हजार 900 रूपयाची देशी विदेशी दारु आढळून आली. पोलिसांनी एका जणांसह पिकअप जप्त केले आहे. या प्रकरणी पोलीस कर्मचारी विनोद वाघमारे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संशयित आरोपी सिध्दार्थ दादाराव खरात रा कुंभारी पिंपळगाव याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. सदरील कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके, जमादार डी.आर. बरले, गणेश शिंदे, विनोद वाघमारे, आदींनी केली आहे. या कारवाईने अवैध देशी दारूची वाहतूक करणाऱ्यांच्या धाबे दणाणले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके यांनी अवैध धंदे चालकांवर कारवाई करण्याची मोहीम उघडली असल्याने अवैध धंद्यावर दररोज कारवाया केल्या जात असल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.



# बोगस बियाणे, खतांचा सुळसुळाट

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर:** मान्यता नसलेले बियाणे, रासायनिक खते व कीटकनाशकांची विक्री करणाऱ्या २९ कृषी सेवा केंद्रांना विक्री बंद करण्याचे आदेश देण्यात आले तर २५ विक्रेत्यांचे परवाने निलंबित करण्यात आले आहे. कृषी विभागाच्या या कारवाईमुळे विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहे.

खरीप हंगामात मोठ्या प्रमाणात बोगस बियाणे, खत व कीटकनाशकांची कृषी विभाग,जिल्हा परिषदे कृषी विभागाच्या ४० गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांनी जिल्ह्यात तपासणी मोहीम हाती घेतली होती. त्यासाठी जिल्हास्तरावर एक आणि तालुकास्तरावर १३ असे एकूण १४ भरारी पथक स्थापन करण्यात आले. या पथकामार्फत ३ बियाणे उत्पादक आणि ४३४ कृषि सेवा केंद्रांची आकस्मिक तपासणी केली. बियाणांचे १४३, रासायनिक खतांची १३७ आणि कीटकनाशकांचे २५ नुमने तपासणीसाठी घेतले. ते प्रयोगशाळेत पाठवले. यापैकी खतांचे १३, बियाणे व कीटकनाशकाचा प्रत्येकी एक नमुना अप्रमाणित आढळून आले. गुणवत्ता नियंत्रण मानकांची पूर्तता न केल्याने एकूण २५ कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले तसेच २९ कृषी सेवा केंद्राना विक्री बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# ज्ञानदेव तनपुरे यांची परतूर मंठा विधानसभा अध्यक्षपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** हृद्सम्राट हिंदू बाळासाहेब ठाकरे साहेब व धर्मवीर आनंद दिग यांचे आर्शिवादाने महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुंख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाने तसेच शिवसेना सचिव संजयजी मोरे, खाजदार श्रीकांत शिंदे, शिवसेना उपनेते तथा मूळ राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर व युवासेना राष्ट्रीय कार्यकर्ता सदस्य यांच्या आदेशाने आपलीसेना निवडणूक अध्यक्ष ( कार्यक्षेत्र परतुर -मंठा ) पद नियुक्त करण्यात येत आहे.तरीही आपण शिवसेना नेते व पक्ष प्रमुख एनाथराव शिंदे यांचे विचार तळागळा पर्यंत पुढे नेऊन पक्ष संघटन मजबुत करतान अश्या मोठ्या अपेक्षेने आपली नियुक्ती केली आहे. सदरील निवड ही सहाच महीण्या करिता केली आहे, तरी आपले कार्य बघुन पुढील निवड करण्यात येईल.



# निम्बार्क इंग्लिश स्कूलचा १०० टक्के निकाल

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** स्वराज्य बहुउद्देशीय प्रतिष्ठान संचलित, निम्बार्क इंग्लिश स्कूल अँड जुनियर कॉलेज पैठण.ता. पैठण जि. औरंगाबाद माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु / मार्च-2023 परीक्षेत निकाल 100 % लागला. या वर्षी विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले. शाळेचे सर्व विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण त्यात प्रथम क्र कु . ईश्वरी संदीप गोर्डे - ९७.४० % द्वितीय क्र : आदित्य अमित गायकवाड -९७.०० % तृतीय क्र : समृद्धी योगेश ससाणे - ९६.४० % तृतीय क्र : यश संतोष नलावडे - ९६.४० % याच्या सह सर्वच विद्यार्थीनी ९०% पेक्षा जास्त मार्क मिळवून यश संपादन केल्याने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्री.महेश आगे साहेब सचिव प्रविण पोकळे सर शाळेचे मुख्याध्यापक श्री . त्रिंबक बटूळे, प्रा प्रविण मोरे , शाळेचे सहशिक्षक रामनाथ जवरे, दत्तात्रय चेडे, कृष्णा जाधव, सौ.साधना मोरे, सौ पूजा औटे, प्रतिभा ज्योतीक,प्रमोद ढाकणे , सामाजिक कार्यकर्ते श्री रतन गारदे , गणेश खोसे , डॉ सुनील गायकवाड ,माणिक थोरात , सचिन ज्योतीक., भाऊसाहेब दसपूते यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.






नक्षत्रवाडी येथील गट क्र. 8/1, समर्थ एलक्लेव्हमध्ये पहिल्या मजल्यावरील 2 बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे. एकूण क्षेत्रफळ 910 स्क्वेअर फूट, क्लिअर टायटल, सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ,
संपर्क : मो. 7588818406

महाराष्ट्र Business Katta














कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

# ओडिशा रेल्वे अपघातामागे कारस्थान आहे ?


आधुनिक केसरी

**ओडिसा राज्यातील बालासोर येथे वीस वर्षातील मोठा विचित्र व दुर्देवी अपघात झाला आहे. यात जनरल डब्बे उध्वस्त झाल्याने मृतात मजूर कुटुंब अधिक आहेत. हा अपघात होताच! रेल्वे मंत्री वैष्णव व पंतप्रधान मोदी घटनास्थळी धावले!अपघातील जखमी लोकांना तातडीने वैद्यकीय सेवा व आर्थिक मदत देणे, मृत व्यक्तींच्या कुटंबाना धीर देणे, हे सरकारचे प्राथमिक कर्तव्य असते! यात कर्तव्यात मोदी सरकार कमी पडल्याचे दिसत नाही. पण दुसरीकडे विरोधी पक्षाने अपघातावर मात्र राजकारण करण्यात गुंततेला पहावयाला मिळाला. या रेल्वे अपघातामागे मानवी षडयंत्र असावे!असा शंका येऊ लागला आहे. त्यामुळे रेल्वेने आता सी.बी आय. मार्फत चौकशी करण्याचा निर्णय घेतला आहे.**





भारतीय रेल्वे जगातील आठवी सर्वात मोठी व्यवसायिक संस्था आहे. या रेल्वे मार्गाची लांबी६७ हजार ४१५ कि.मी,आहे. सुमारे८७ हजार ७०२ रेल्वे गाड्यातून २३१ लाख लोक प्रवास करतात. पण याकडे आजपर्यंत केंद्र सरकारने दुर्लक्ष केले! रेल्वे प्रवास हा सुखकर व सुरक्षित आहे. पण रेल्वेचा एखादा अपघात झाला की, मात्र रेल्वेचा प्रवास शंभर टक्के असुरक्षित आहे, असे प्रश्न निर्माण करुन प्रवाशात भीती निर्माण केली जात आहे. अपघात कोणताही असो,तो माणसाच्या निष्काळजीप किंवा तांत्रिक कारणामुळे होत असतो.देशात यापूर्वी रेल्वे अपघात झाले आहेत. हे अपघात टाळण्यासाठी सतत उपाय योजना व सुधारणा करणे महत्वाचे असते. प्रगत राष्ट्रात रेल्वेचे मोठे अपघात होत असतात! केंद्रात काँग्रेसचे सरकार असताना रेल्वे अपघात थांबवू शकलेले नाही. रेल्वे क्रासिंग मानविरहित गेटवर हजारो जणांना प्राण गमवावे लागले! २४ जुलै२०१४ रोजी मध्ये हैद्राबाद मार्गावर रेल्वे गेटवर शाळेच्या बसला रेल्वेची धडक बसली! त्यात २५ मुले मृत पावली. यात अनेकाचे डोळे हात, पाय. कायमचे गमावले. तेंव्हा मी, मित्र चंद्रकांत गुरव व गोविंदराव क्षीरसागर हे हैद्राबादला जात होतो. त्याचे आम्ही साक्षीदार आहोत.अशा अनेक घटनांची नोंद नाही.केंद्रात मोदी सरकार आल्यापासून रेल्वेच्या विकास कामांना गती मिळाली. केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीताराम यांनी २०२३-२४ या अर्थसंकल्पात रेल्वेसाठी २.४० लाखाची तरतूद केली. रेल्वेच्या प्रशासनात सुधारणा करण्यावर भर दिला आहे.यात रेल्वे स्थानकात स्वच्छता,डब्यात स्वच्छता,आरक्षण प्रणालीत सुधारणा, नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करून यात बदल करत आहे.अनेक राज्यात नवीन जलद गाड्या सुरू करण्यात येत आहेत.स्वातंत्र्यानंतर प्रथम नऊ वर्षात रेल्वे विभागात सुधारणा झालेल्या आहेत.काँग्रेस राजवटीत रेल्वे प्रशासनात अनागोंदी कारभार होता. मराठवाड्यातील जनतेला तर रेल्वे रूंदीकरणासाठी आंदोलन करावे लागले.लोकांनी काठ्या खव्या लागल्या,जेलमध्ये गेले!पण केंद्रातील सरकार मात्र 'कुंभकर्णी' झोप घेत असे! रेल्वेरुंदीकरण नवीन मार्ग,नवीन गाड्या सुरू करण्याची जनतेवा आंदोलन करावी लागली,अनेक वर्षे प्रतीक्षा करावे लागली! तेंव्हा रेल्वे अर्थसंकल्पाकडे राज्याचे,सामान्य लोकांचे लक्ष लागून असावयाचे! आज ती परिस्थिती राहिलेली नाही.रेल्वे विभागाकडे मागणी न करता मिळत आहे! यात रेल्वेची वीस वर्षानंतर मोठी दुर्घटना घडली!रेल्वे मंत्री, पंतप्रधान, आरोग्य मंत्री तेथे पोहचले!यावरून केंद्रातील भाजपा व मोदी सरकार संवेदनशील आहे,हे दिसून आले! दुर्घटना झाल्यानंतर प्रथम जखमींना वाचविणे,त्यांना वैद्यकीय सेवा व आर्थिक मदत तसेच मृत व्यक्तीच्या परिवारांना धीर देणे,त्यांना आर्थिक मदत करणे, हे सरकारचे प्राथमिक कर्तव्य असते!पण यात कर्तव्यात मोदी सरकारने कोठे कसूर केल्याचे दिसत नाही.तरी रेल्वे दुर्घटनेला जबाबदार कोण ? हा प्रश्न शिल्लक राहतो!यात ज्या प्रवाशांचा बळी गेला,त्यांचा काय दोष ? हे प्रश्न सरकारला विचारणे, यात काही गैर नाही! पण अश्या घटनेच्यावेळी सभ्यपणाचे लक्षण म्हणून विरोधी पक्षाने करणे संयम बाळगयाला हवा होता! कारण अपघाताचे निश्चित कारण पुढे आले नव्हते!या पंतप्रधान आणि रेल्वेमंत्र्यांनी अपघातात चूक झाल्याचे मान्यही केले होते!त्यांनी सारवासारव केलेली नाही.या दुर्घटनेचा शोध घेणे महत्वाचे होते, तेंव्हा रेल्वे सुरक्षा आयुक्तामार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले!यात मोदी व रेल्वे सरकारने याबाबत सर्व पाऊले उचलेली आहेत. यात रेल्वे दुर्घटना म्हणजे काँग्रेस,तृणमूल काँग्रेस,आम आदमी, राष्ट्रवादी काँग्रेसला मोदी सरकारला घेरण्याची व राजकारण करण्याची संधीच मिळाली!जसे,गिधाडाला फिरताना शिकार मिळावी,तशी विरोधी पक्षाला शिकार मिळाल्याचा आनंद झाला असावा!केवळ ओरिसाचे मुख्यमंत्री यांनी या अपघाताच्या गलिच्छ राजकारणात पडलेले नाहीत! अपघात होताच,आडिसा राज्य सरकारचे प्रशासन व स्थानिक लोक अपघातग्रस्तांना वाचविण्यासाठी पुढे आले,यातुन त्यांनी माणुसकीचे दर्शन घडविले.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते रक्तदान व इतर मदतीसाठी धावले,याची माहिती आली.मग तेंव्हा काँग्रेस कार्यकर्ते मदतीसाठी धावत गेले काय ?अशावेळी मानवतेच्यादृष्टीने मदत करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.पण अपघात होताच विरोधी पक्षांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या राजीनाम्याची मागणी केली.जणू वैष्णव हेच या रेल्वे अपघाताला दोषी आहेत!तेंव्हा त्यांचा राजकीय बळी घेण्याची मागणी केली गेली!वैष्णव हे राजस्थानमधील एका खेड्यात राहणारे नेते आहेत.यांच्या गावी रेल्वेच काय ?बस सुध्दा जात नाही.तेथे पायी जावे लागते. ते घटनास्थळी ठाण मांडून बसले होते.त्यांना गरीब माणसाचा दुःख माहित आहे.वास्तविक या दुर्घटनेच्या चौकशीच्या अहवालाची प्रतीक्षा करावी,असे विरोधी पक्षाला का वाटले नाही ? या अहवालानंतर मोदी सरकारवर टीका करता आली असती! निवडणूका अजून लांब आहेत! संसदेचे अधिवेशन होणार आहेत! तेंव्हा या रेल्वे अपघातावर प्रश्न विचारता आले असते!ममता बॅनर्जी रेल्वे मंत्री असताना अपघातात १४५१ प्रवासी मृत्यू पावले!नितीशकुमार यांच्या कार्यकाळात १५२७ व लालू यादव यांच्या काळात अपघातात ११५९ प्रवासी मृत्यू पावले! मग हे दोषी नाहीत काय ? त्यांचेवर खूनाचे खटले दाखल करावयास पाहिजे होते! आतारेल्वे मंत्र्याचा राजीनाम्यासाठी नैतिकतेचे उदाहरण दिले जात आहे. यात १९५६ लालबहादूर शास्त्री यांनी मेहबूबनगर रेल्वे अपघातात ११२ जण मृत पावले.तेंव्हा त्यांनी नैतिकतेच्या आधारावर रेल्वेमंत्री पदाचा राजीनामा दिलेला होता.तर नीतीशकुमार१९९९ मध्ये रेल्वे अपघातानंतर राजीनामा दिला होता, पुन्हा रेल्वेमंत्री झाले.देशात महिला रेल्वेमंत्री होण्याचा मान श्रीमती ममता बनर्जी यांनी भाजपाच्या काळात मिळाला.त्यांनी रेल्वे अपघातावरून राजीनामा दिला.पंतप्रधानांनी तो स्विकारला नाही.तसेच सुरेशप्रभू यांनी अपघातानंतर राजीनामा दिला होता. काँग्रेसचे सरकार काळात रेल्वे अपघात झाले,रेल्वेत अनेक घोटाळे झाले! तेंव्हा ५५ वर्षात काँग्रेस सरकारने किती रेल्वे मंत्र्यांनी राजीनामे घेतले!खर तर! आता काँग्रेसमधून नैतिकता' हा शब्द हद्दपार झालेला आहे! १८ आक्टोबर २०१८अमृतसर रेल्वे पटरी जवळ काँग्रेस कार्यकर्त्यांनी रावण जाळण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता.हा कार्यक्रम पहाण्यासाठी गर्दी झाली होती.त्यामुळे लोक रेल्वे रूळावर थांबले. तितक्यात पटरीवर रेल्वे धावली व पंधरा सेंकदात ६० जणांचा जीव गेला! तेथे काँग्रेसचे नेते नवज्योतसिध्दू व त्याची पत्नी तेथे होती, त्या दोघांनी पलायन केले! बिहार रेल्वे अपघात- १९८१ मृत ८०० जण, केरळ-१९८८ मृत १०० जण,उत्तर प्रदेश- १९९५-३५० मृत, आसाम- १९९९- ३०० जण मृत, आंध्रप्रदेश- २००५ यात शंभर जण मृत पावले! हे मोठे अपघात आहेत! असे अगणित रेल्वे अपघात झालेले आहेत! रेल्वेमंत्री लालू प्रसाद होते! त्यांचा आदर्श बघा! नोकरीच्या मोबदल्यात जमीन घेतल्या गेल्या! रेल्वेच्या कामासाठी लाच घेताना काँग्रेसचा नेता रंगेहात पकडला गेला होता! तेंव्हा काँग्रेसला कधी नैतिकता आठवली नाही.मंत्र्याचा राजीनामा देणे,यातून पळ काढण्यासारखे आहे.वैष्णव यांनी पंतप्रधानांकडे राजीनामा देण्याची तयारी दर्शविली असावी! मंत्र्यानी राजीनामा दिला की,प्रश्न सुटतात काय ? अशावेळी रेल्वेमंत्री तेथे असणे महत्वाचे असते! यातून रेल्वे प्रशासकडून मदत,सेवा,वाहातूक व्यवस्था सुरळीत होते! पूर्वीचे रेल्वेमंत्री 'उंटावरुन शेळ्या हाकत असत'! समजा!काँग्रेसचे सरकार आले तर रेल्वेचे अपघात न होण्याची ग्यांरटी स्कीम' आहे काय ? या रेल्वे अपघातामागे कारस्थान असले पाहिजे,असा संशय येवू लागलेला आहे.कारण लूप लाईन वर लोखंडी सळीने भरलेली मालगाडी थांबलेली होती.त्यावेळी ६.५२ ते ६ .५५जलद गतीने मुख्य रेल्वे पटरीवरुन जाण्याचे सिंग्नल देण्यात आले होते,असा प्राथमिक अहवाल आहे. रेल्वे बोर्डाने सिंग्नल- मध्ये कोठेही तांत्रिक बिघाडाचे कारण समोर आलेले नाही,हे स्पष्ट केले आहे!मग कोरोमंडळढलद रेल्वे मुख्य पटरीवरुन न जाता ती लूप लाईन मार्गावर कशी काय गेली.या गाडीचे इंजन मालगाडीच्या डब्याच्यावर चढले,तर इतर डब्बे दुसऱ्या मार्गावर उडाले.त्याचवेळी दुसऱ्या मुख्य पटरीवर बेंगळूर -हावडा जलद गाडी येत होती. त्यावर जावून डब्बे आदळले.त्यामुळे मोठी घटना घडली आहे! हे सर्व तीन मिनिटात घडले आहे! कोरामंडल ही जलद गाडी लूप लाईन जाण्यामागे ट्रकमध्ये कसा बदल झाला ? यात कोणी चूक केली ? हे कारस्थान तर नाही ना ? हे मुख्य कारण आहे! देशात रेल्वेचे अनेक अपघात झाले पण आजपर्यंत कोणाला जबाबदार धरले गेलेले नाही व कधीच सांगितले जात नाही.१९६५ पासून रेल्वे अपघात टाळण्यासाठीचे पाच अहवाल रेल्वे प्रशासनाकडे धूळखात पडले आहेत! याचा रेल्वे प्रशासनाने गांभीर्याने विचार केला दिसत नाही.काँग्रेस पक्षाने लगेच तीन प्रश्न विचारले आहेत!तसेच मोदी सरकारचे नऊ वर्षे झाल्यानंतर नऊ प्रश्न विचारले आहेत,मग ५५ वर्षात काँग्रेस सरकार होते! तेंव्हा ५५ प्रश्न विचारले तर तीळपापड होईल! काँग्रेस रेल्वे अपघाताचे राजकारण कारण त्यांना २०२४ सत्तेची लगीन घाई झाली आहे.



# शिवराज्याभिषेक - समता व सन्मान



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्यभिषेक हा भारतीय इतिहासातील एक महत्वपूर्ण घटना आहे. मराठा साम्राज्याचे पहिले राजे म्हणून त्यांचा राज्याभिषेक झाला. छत्रपती शिवरायांच्या राज्यभिषकां बद्दल अनेक समज गैरसमज निर्माण झालेले आहेत. परंतु छत्रपतींचा राज्यभिषेक हा केवळ राजसत्ता मिळवण्यासाठी केलेला सोहळा नव्हता तर राज्यभिषेक हा सर्वसामान्य लोकांनामध्ये समता प्रस्थापित करून सर्वसामान्य लोकांचा सन्मान वाढविण्याचा दिवस आहे. छत्रपती शिवाजी महाराज समजून घेताना आपल्याला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अगोदरची व नंतरची परिस्थिती बघणे आवश्यक आहे. तरच आम्हाला छत्रपती शिवाजी महाराज समजू शकतात.**

आज पर्यंत बऱ्याच स्वयघोषीत इतिहासकारांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास चुकिच्या पद्धतीने व ब्राह्मण श्रेष्ठतेशी जोडलेला आहे. छत्रपती शिवरायांच्या नंतर काळात छत्रपती शिवरायांना मुस्लिम द्वेषी म्हणून कलम कसायांनी मांडणी करून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने तरुणांना आक्रमक बनवले जात आहे. मुळात छत्रपती शिवाजी महाराज हे विज्ञानवादी दृष्टिकोन बाळगणारे असल्याने वैदिक पद्धतीने राज्यभिषेक का केला? यावर काही स्वंयघोषीत इतिहासकार सांगतात छत्रपती शिवाजी महाराज गोब्राम्हण प्रतिपालक होते. मुळात छत्रपती शिवाजी महाराज हे ब्राह्मण प्रतिपालक नव्हते ही बाब निनाद बेडेकर यांच्या लिखाणातून दिसून येते. निनाद बेडेकर म्हणतो की छत्रपती शिवाजी महाराज यांनी राज्यभिकांच्या वेळी पापक्षालन करण्यासाठी तुला विधी केला होता. हा विधी करण्यामागे जे काही ब्राह्मण चुकुन छत्रपतींच्या हातुन मारले गेले त्याविषयी हा विधी. थोडक्यात यातही ब्राह्मण वर्चस्व व श्रेष्ठत्व दाखवण्याचा प्रयत्न केला गेला. दुसरी गोष्ट निनाद बेडेकर याच्याच मताचा विचार केला तर छत्रपती शिवाजी महाराजांनी यांनी ब्राम्हणांच्या हत्या केल्या होत्या म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराज ब्राम्हणप्रतीपालक नव्हते हेच सिद्ध होते. छत्रपती शिवरायांनी ब्राम्हणांच्या हातुन राज्यभिषक करून घेतला तो केवळ राज मान्यतेसाठी. आजही अनेक लोक ब्राह्मण विधीलाच सर्वस्व माणतात. त्याकाळी तर ब्राह्मणांचे वर्चस्व होतेच. राज्यभिषेकानंतर मात्र ब्राम्हणी विचार धारेच्या विरोधात छत्रपती शिवरायांनी काम केले. बहुजन समाजातील जेष्ठ व संशोधन इतिहासकार मा. म. देशमुख सरांच्या मता नुसार आम्हाला पाच टक्के ही खरा इतिहास सांगीतला जात नाही आणि जो काही सांगितला जातो तो केवळ ब्राम्हणश्रेष्ठ दाखवण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु छत्रपतींच्या राज्यभिषका नंतर समता बंधुता न्याय व स्वातंत्र्यावर आधारित समाज व्यवस्था निर्माण झाली. शेतकरी व सैन्याच्या कल्याणाचे निर्णय घेण्यात येऊन त्यांना सक्षम करण्याचे ध्येयधोरणे आखल्या गेली. जाती व्यवस्था नष्ट करून मावळा या शब्दांने ओळख निर्माण केली. जात धर्म न पाहता कला व क्षमते नुसार कामाची विभागणी केली. थोडक्यात छत्रपती शिवरायांचे राज्य केवळ सत्ता उपभोगण्यासाठी नाही तर सर्व सामान्य लोकांना संधी, समता, व सन्मान देण्यासाठी होते. छत्रपती शिवाजी महाराज राजा असुनही शिस्त व उत्तम प्रशासन म्हणून काम करत होते. ते स्वतः राजे असुनही कधी स्वतः ला राजे समजत नसत. गुन्हेगारांना गुन्हा बघुन शिक्षा दिली जात होती. मान्सून पुर्ण शेतकऱ्यांना सर्व सुविधा पुरवल्या जात होत्या. शेती विषयी कामासाठी बिनव्याजी कर्ज दिले जात होते. स्त्रियांचा सन्मान व सामाजिक समता होती. औरंगजेब मुसलमान असला तरीही स्वतः चे अंगरक्षक मुस्लिम होते. याचा अर्थ छत्रपतींचे स्वराज्य धर्मावर नाही तर कर्मावर आणि निष्ठेवर होते. म्हणुनच राजेशाही असतानाही लोकांना ते रयतेचे स्वराज्य वाटू लागले. याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे हजारो वर्षांपासून बहुजन समाजाला जे हक्क अधिकार नाकारले त्याच बहुजन समाजासाठी उद्धारकर्ते म्हणून छत्रपती शिवरायांची छबी होती. छत्रपतींच्या काळात जनता सुखी व समाधानी होती. छत्रपती शिवाजी महाराज न्यायीक व जनकल्याणकारी होते. राजे अजूनही सर्व सामान्य लोकांचे कल्याण केले. आज जर याच छत्रपतींच्या देशात बघितले तर लोकशाही आहे. अगदी छत्रपती शिवरायांच्या शिवशाहीमध्ये जशी व्यवस्था होती तीच व्यवस्था लोकशाही मध्ये आहे. राजेशाही जाऊन लोकांची



सत्ता आली व जनकल्याण करण्यासाठी लोकसेवक आले. परंतु ह्या लोकसेवकांनी छत्रपतींची व्यवस्था नाकारून अप्रत्यक्ष पणे हुकुमशाही करण्याचा प्रयत्न केला. शेतकरी व सर्वसामान्य जनता त्रस्त आहे. शेतकरी समस्या ग्रस्त आहेत. लोकसेवक असताना ही हे स्वतः ला स्वतः चे सरकार असल्यासारखे वागुन स्वतः च्याच नावाने सरकार शब्द वापरतात. आरोपींना शिक्षा ही आरोप बघुन नाही तर जात बघुन होते. मावळा शब्द बाजूला करून धार्माच्या नालाखाली तेढ निर्माण केली जाते. प्रशासनामध्ये शिस्त व समजामध्ये समता, बंधुता स्वातंत्र्य व न्याय दिसत नाही. विज्ञानवादी असलेल्या छत्रपतींच्या राज्यात अज्ञान अंधश्रद्धा पसरवून लोकांना माणसिक गुलाम बनवले जाते. लैंगिक शोषणाचे आरोप असलेल्या लोकांना सरंक्षण दिले जाते. जे लोकशाही मध्ये लोकांना मिळायला पाहिजे ते मिळत नाही. परंतु छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवशाहीमध्ये लोकशाही सारखे जनकल्याण होते. म्हणून लोकशाही मध्येही छत्रपती शिवाजी महाराज वंदनीय आहेत. छत्रपती शिवरायांच्या राज्यातच छत्रपतींच्या नावाने धार्मिक तेढ निर्माण करतात. छत्रपती शिवाजी महाराज काल्पनिक शक्ती नाही वा मनोरंजनाची कथा नाही. ते जिवन जगण्याचा समता बंधुता न्याय व स्वांतत्र्याचा मार्ग आहे. अन्याय अत्याचारी व्यवस्थेविरुद्ध लढण्याची ताकद छत्रपती शिवाजी महाराज आहेत. स्वतः च्या जनतेसाठी जिव पणाला लाऊन काम केले. आजचे राज्येकर्ते जनतेला लुटून स्वतः चे घर भरतात. छत्रपती महान व वंदनीय का आहेत तर ते जनकल्याणकारी व मानवतावादी होती. स्त्रियांचा सन्मान करून शेतकऱ्यांचे हीत जोपासणारे होते. शिवशाहीमध्ये जसी व्यवस्था होती तशी आज आहे का हे आपल्याला बघणे व त्याचा तुलनात्मक अभ्यास करणे आवश्यक आहे. छत्रपती शिवरायांचा एक राज्यभिषेक झाला आणि बहूजन समाजातील लोकांचा उद्धार झाला. छत्रपती शिवराय हे दोन व्यवस्थेशी लढत होते एक म्हणजे परकीय मोघल व दुसरे म्हणजे अंधश्रद्धा विषमता वर आधारित असलेल्या व्यवस्थे विरोधात. आज परकीय शत्रु नाहीत परंतु आजचे राज्येकर्ते परकीय शत्रुपेक्षा जास्त लुट शोषण करून अन्याय अत्याचार करत आहेत. जे की शिवाजी महाराज यांनी अन्याय अत्याचारी शोषण करणाऱ्यांना कठोर शिक्षा केली. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य आदर्श होते व याच स्वराज्याला व छत्रपती शिवाजी महाराज यांना औपचारिक मान्यता देण्याचा दिवस म्हणजे राज्यभिषेक दिन होय. राज्यभिषेक झाल्या मुळे बहूजन समाजाला हक्क अधिकार तर मिळालाच आणि सन्मानही मिळाला. राजा असूनही हक्क अधिकार सन्मान देणारे उदार मनाचे राजे हे जागतिकच होते. आणि त्याच राजाच्या नावावर धार्मिक राजकारण करून विषमता जोपासणाऱ्या आणि जनतेच्या हक्काच्या पैशावार डल्ला मारणाऱ्या राजकीय प्रवृतींना ठेसले पाहिजे तरच समाजात छत्रपतींचे विचार रूजून छत्रपतींचा सन्मान होईल. छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्यभिषेक म्हणजे विषमता वादी व्यवस्थेच्या व स्वतःला श्रेष्ठ समजणाऱ्या लोकांच्या व्यवस्थेला सुरुंग होता. लोकांना जातीधर्माच्या नावाखाली नावाखाली विभागून स्वतः ची पोळी भाजुन घेण्याची बंद पडत होती. कारण मावळे म्हणून सर्वांना एकत्र आणण्याचे काम केले. मानसन्मान देऊन विषमता नष्ट केली. राजा असुनही लोकशाही प्रमाणे राज्यकारभार करून प्रत्येकांच्या लहान मोठ्या समस्या अगदी कमी वेळात सोडवून जनतेचे कल्याण केले. अंधश्रद्धा पाखंड झुगारून विज्ञानवादाला चालणा दिली. संरक्षण, यूद्ध कौशल्य, प्रशासन, नियोजन, संघटक म्हणून छत्रपती शिवाजी महाराज हे कुशल होतेच परंतु सर्व गुण संपतीचा वापर रयतेसाठी करून जागतिक कार्य केले. परंतु छत्रपती शिवाजी महाराज ज्यांना राजा होणे मान्य नव्हते त्या लोकांनी छत्रपतींना मर्यादित करण्याचा प्रयत्न केला. परंतु छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य व विविर एका जातीत आणि एका पुस्तकात बंद करणे शक्य नाही. छत्रपतींच्या कार्याची व विचाराची दखल इंग्रजी लेखक ल इतिहासकारांनी घेतली आहे. म्हणून ते जागतिक होते आणि राहतील यात शंकाच नाही. बाळ शिवाजी ते छत्रपती शिवराय यामध्ये महत्वाची घटना म्हणजे शिव राज्यभिषेक होय. राज्यभिषकांमुळे त्यांना औपचारिकता मान्यता मिळाली व बहुजन समाजातील लोकांचे कल्याण झाले. शत्रूच्या महिलांचाही सन्मान करणाऱ्या व आरोप बघून शिक्षा ठोठावणाऱ्या राजाचा राज्यभिषेक बहुजन समाजासाठी आनंदाचा व समतेचा तसेच राष्ट्रहीताचा दिवस होय. शिवराज्याभिषेक दिनांच्या बहुजन समाजाला मंगलमय सदिच्छा..

# सायकलिंगवर प्रेम, मात्र पायाभूत सुविधा नाहीत



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**शारीरिक शक्तीने चालविले जाणारे दोन चाकी वाहन म्हणजे सायकल होय. अनेक ठिकाणी हे वाहतूक, व्यायाम व खेळ यांचे मुख्य व स्वस्त साधन आहे. हे साधन तीन तसेच चार चाकीही असू शकते. ती पायांनी चालविता येणारी व लोखंडी फ्रेम असणारी असते. या वाहनाने प्रदूषण अजिबात होत नाही. तिच्या उत्पादनासाठी पंजाब, हरियाणा ही राज्ये अग्रेसर आहेत. दोन वर्षांपासून गडचिरोली शहरात सायकल स्नेही मंडळ स्थापन होऊन कार्यरत आहे. ते मंडळ येथील अनेक लोककल्याणकारी कार्यात सक्रिय सहभाग घेत असते. जवळपास दोन शतकांपासून आपण सायकलीचा वाहतुकीसाठी वापर करत आहोत.**

सायकलीच्या वापराबाबत जनजागृती निर्माण होण्यासाठी सायकल दिन साजरा केला जातो. हल्ली थोड्या अंतराच्या प्रवासासाठीही दुचाकी आणि चारचाकींचा सर्रास वापर केला जातो. त्यामुळे प्रदूषण, तापमान वाढीचे प्रमाण वाढले आहे. दिल्लीमध्ये तर वाढत्या प्रदूषणाला रोखण्यासाठी सम-विषमचा प्रयोग केला गेला. वाढत्या प्रदूषणाचा धोका वेळीच ओळखला नाही तर दिल्लीसारखी परिस्थिती आपल्या शहरातही उद्‌भवू शकते. त्यामुळे यावर उपाय करता येण्याजोगा एकच पर्याय आहे. तो म्हणजे शक्य तेवढ्या जास्त प्रमाणात प्रवासासाठी सायकलचा वापर करणे. प्रदूषण रोखण्यासोबतच शारीरिक आरोग्यासाठीही सायकल चालविणे उत्तम व्यायाम ठरतो. त्यामुळे प्रत्येकाने आठवड्यातून किमान एक दिवस तरी सायकल चालविण्याचा निर्धार करावा. सायकल चालविण्याचे आरोग्यदायी आणि पर्यावरणीय फायदे लोकांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात करावी. शहरात सायकल चालविण्याची संस्कृती रुजविण्यासाठी सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक संघटना आणि व्यक्तींनी पुढाकार घेतला पाहिजे. लोकांचा सायकलकडे पाहण्याचा दुय्यम दृष्टिकोन बदलण्याची व सायकलिंगमुळे होणारे फायदे समजावून सांगितले पाहिजे. एवढेच करून चालणार नाही. शहरातील मार्केट, मॉल, रेल्वेस्थानक, बसस्थानक अन्य महत्त्वाच्या ठिकाणी सायकल पार्क करण्याची व्यवस्था असावी. सायकल संस्कृती रुजविताना जी वागणूक रस्त्यावरून मोटारसायकल, कार चालविणाऱ्यांना मिळते तीच सायकलिंग करणाऱ्यांना मिळाल्यास सायकल चालविण्याकडे नागरिकांचा कल वाढविण्यास मदत होईल. पालक पाल्यांना ५० ते ६० हजार रुपयांची मोटारसायकल घेऊन देतात. पण दहा हजार रुपयांची सायकल घेऊन देत नाही. कारण ते त्यांना प्रतिष्ठेचे वाटत नाही. मोटारसायकलच्या किमतीपेक्षा महागड्या सायकल मिळतात. त्याने आरोग्य सुदृढ ठेवण्यास मदत व पैशाची बचत आणि अपघातांना पायबंद लावणे शक्य होते. परंतु ते सर्व या माहितीपासून अनभिज्ञ नव्हे तर झोपेचे सोंग घेऊन आहेत. न्यूयॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्र-युनायटेड नेशन्स महासभेने ३ जून हा दिवस जागतिक सायकल दिवस- वर्ल्ड बायसीकल डे म्हणून साजरा करण्याची घोषणा केली होती. याच्या उद्घाटन सोहळ्यात संयुक्त राष्ट्राचे अधिकारी, मुत्सद्दी, ॲथलेट्स, सायकलिंग समुदायाच्या अधिवक्त्यांसह मोठ्या संख्येने लोक उपस्थित होते. यावेळी सायकल चालवण्याचे महत्त्व आणि आरोग्यासाठी होणारे फायदे सांगण्यात आले होते. हा दिवस प्रथम ३ जून २०१८ रोजी अधिकृतपणे साजरा करण्यात आला होता. दैनंदिन जीवनात सायकलीचा वापर लोकप्रिय करण्याच्या उद्देशाने हा दिवस जगभरात साजरा केला जात आहे. हा दिवस सायकलचे वैशिष्ट्य आणि त्याचे अष्टपैलुत्व ओळखण्यासाठी साजरा केला जातो. सायकल चालविणे केवळ शारीरिक आरोग्यासाठीच चांगली नाही, तर ते पर्यावरण आणि अर्थव्यवस्थेसाठी देखील अनुकूल आहे. यावर्षी म्हणजेच २०२२ साली पाचवा जागतिक सायकल दिवस साजरा केला जात आहे. असे म्हटले जाते की, शहरवासीयांना जवळपासच्या अंतररावर जायचे असल्यास त्यांनी सायकलचा वापर करावा. यामुळे दररोज शेकडो लिटर पेट्रोलची बचत होईल. त्याचबरोबर शहरातील प्रदूषणाची पातळी देखील कमी होईल. याशिवाय नियमित सायकलिंग केल्याने हृदयरोग, स्ट्रोक, कर्करोग आणि मधुमेह यासारख्या आजारांमुळे होणार मृत्यूचा धोका कमी होण्यास मदत होते. दररोज ३० मिनिटे सायकल चालविणे आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर असल्याचा डॉक्टरांचा विश्वास आहे. दररोज ३० मिनिटे सायकल चालवल्याने रात्रीची झोप चांगली येते. जर आपणास रात्री झोप न लागण्याचा त्रास असेल, तर नियमित सायकल चालविल्याने आपल्या या समस्येचे निराकरण होऊ शकते. एका संशोधनानुसार एखादा व्यक्ती दररोज ३० मिनिटे सायकल चालवत असल्यास त्याचे मेंदू सामान्य व्यक्तीपेक्षा अधिक सक्रिय राहते. तसेच ब्रेन पॉवर १५ ते २० टक्क्यांनी




वाढण्याची शक्यताही असते. सायकलिंग केल्याने रोगप्रतिकारक यंत्रणेला योग्यरित्या कार्य करण्यास मदत होते. एका अहवालानुसार दररोज अर्धा तास सायकल चालविल्याने इम्यून सेल्स सक्रिय होतात आणि कोणताही आजार होण्याचा धोका कमी करतात. सायकलिंग शरीरातील अतिरिक्त कॅलरी बर्न करण्यास मदत करते. नियमित सायकलिंग करून शरीरातील अतिरिक्त कॅलरी सहज बर्न करता येते. शारीरिक शक्तीने चालविले जाणारे दोन चाकी वाहन म्हणजे सायकल होय. अनेक ठिकाणी हे वाहतूक, व्यायाम व खेळ यांचे मुख्य व स्वस्त साधन आहे. हे साधन तीन तसेच चार चाकीही असू शकते. ती पायांनी चालविता येणारी व लोखंडी फ्रेम असणारी असते. या वाहनाने प्रदूषण अजिबात होत नाही. तिच्या उत्पादनासाठी पंजाब, हरियाणा ही राज्ये अग्रेसर आहेत. दोन वर्षांपासून गडचिरोली शहरात सायकल स्नेही मंडळ स्थापन होऊन कार्यरत आहे. ते मंडळ येथील अनेक लोककल्याणकारी कार्यात सक्रिय सहभाग घेत असते. जगातील काही देशांमध्ये सायकल चालविण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. यामध्ये नेदरलँड देशाचा उल्लेख अवश्य करावा. नेदरलँडमध्ये तेथील लोक वाहतुकीचे साधन म्हणून ४० टक्के सायकलचा वापर करतात. यासाठी ठिकठिकाणी पार्किंग व्यवस्था, वाहतुकीचे नियम, सहज उपलब्धता या सर्व गोष्टींमुळे तिथे सायकल संस्कृती चांगली रुजली आहे. परदेशात कुठल्याही पायाभूत सुविधा उभारताना सायकलस्वारांची सोय लक्षात घेतली जाते. पायाभूत सुविधा उभारताना सर्वप्रथम पादचारी, सायकलस्वार, सार्वजनिक वाहतूक आणि त्यानंतर खासगी वाहने अशा पद्धतीने रस्त्यांची आणि पार्किंगची आखणी केली जाते. नेदरलॅण्डमध्ये सन २०१४मध्ये एक अनोखा प्रयोग करण्यात आला. तिथे किलोमीटरभर लांब रात्री चमकणाऱ्या सायकल ट्रॅकची निर्मिती करण्यात आली आहे. फ्लोरोसंट रंगाचे विशिष्ट तुकडे सिमेंट-काँक्रीटमध्ये वापरण्यात आले असून दिवसाच्या प्रकाशात ते ऊर्जा साठवून घेतात व रात्रीच्या अंधारात हाच रस्ता उजळून निघतो. स्पेनमधील सॅन सबॅस्टियन या शहरात सन २००९ साली जुन्या रेल्वेच्या बोगद्याचे रूपांतर सायकल ट्रॅकमध्ये करण्यात आले. हा जगातील सर्वात लांब सायकल बोगदा आहे. विशेष म्हणजे सायकलस्वारांच्या सुरक्षिततेसाठी यामध्ये सीसीटीव्ही कॅमेरेसुद्धा बसवण्यात आले आहेत. भारतातही सायकलचा वापर फार पूर्वीपासून होत आहे. सायकल हेच दळणवळणाचे प्रमुख साधन होते. मात्र देशात सायकलसाठी म्हणून काही विशेष पायाभूत सुविधा उभारल्या गेल्याचे फारसे दस्तावेज उपलब्ध नाहीत. सायकलिंगबद्दलचे प्रेम वाढत आहे याबाबत शंका नाही, परंतु सायकलसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यासाठी लागणाऱ्या राजकीय इच्छाशक्तीचा आपल्याकडे अभावच आहे, असे खेदाने म्हणावे लागेल!

# गजानन पाटोळे : सकारात्मकता जोपासणारा अधिकारी

आधुनिक केसरी

**पत्रकारितेत राजकीय नेत्यांसोबत अधिकाऱ्यांशी देखील माझे चांगले सूत जुळले. परखड पत्रकारिता करून देखील मित्रत्व जोपासता येऊ शकते याचा अनुभव मला नेहमीसाठी आला आहे. ज्या अधिकाऱ्यांच्या विरोधात बातमी प्रसिद्ध केली,त्याच अधिकाऱ्यांसोबत त्याच दिवशी मनसोक्त गप्पा मी अनेकदा मारल्या आहेत. ना त्या अधिकाऱ्याने कधी नाराजी व्यक्त केली,ना मी विषय घेतला. हे सगळं तेंव्हाच शक्य होतं जेव्हा तुमचा तुमच्या कामाप्रति उद्देश शुद्ध असेल. कुठलाही दूषित हेतू न ठेवता प्रसिद्ध केलेलं वृत्त तुम्हाला ती ताकद आपोआप देत असतं.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र. : 9422880080

अधिकारी मेहकर मधूनच काय,जिल्ह्यातून जरी बदलून गेला किंवा सेवानिवृत्त जरी झाला किंवा मोठ्या पदावर जरी असला तरीही माझे ऋणानुबंध हे त्या त्या अधिकाऱ्यांसोबत जिव्हाळ्याचेच राहलेले आहे.

आयुष्यात अनेक अधिकारी बघितले, मात्र गोरगरिबांच्या झोपडीत जाऊन त्यांची चूल पेटविणारा,घरचा कर्ता पुरुष गेल्यानंतर, स्वकीयांनी जिथे तोंड फिरवून पाठ दाखविली अशा निराधारांच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहणारा आणि त्यांना खऱ्या अर्थाने आधार देणारा ,तशी कृती करणारा अधिकारी मित्र म्हणून ज्याचं नाव घेता येईल ते म्हणजे लोणार (सरोवर ) पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी गजानन पाटोळे

मागील आठवड्यात गजानन पाटोळे यांची मुलगी ऋतुजा हिचा वाढदिवस संपन्न झाला. ह्या माणसाने वाढदिवस साजरा करत असतांना आपण ज्या मातीतून आलो,ज्या मातीने आपल्याला घडविले, त्या मातीचे ऋण वेगळ्या पद्धतीने फेडण्याचा प्रयत्न केला. आपल्या मूळ गावातील मुलांना वाचनाची आवड लागावी,भविष्यात त्यांच्यातून अधिकारी घडावा हा हेतू नजरेसमोर ठेवून त्यांच्या मुलीने वडिलांच्या पावलावर पाऊल टाकत वाढदिवसानिमित वडगाव माळी येथे ११ हजार रुपयांची पुस्तके भेट दिली आणि अभ्यासिका सुरू करण्याचा मनोदय व्यक्त केला. यावेळी ऋतुजा ने केलेले भाषण सोशल मीडियावर पाहायला-ऐकायला मिळाले. त्यानिमित्ताने ऋतुजा चे वडील सहाय्यक गटविकास अधिकारी गजानन पाटोळे यांचे सामाजिक कार्य नजरेसमोर आले आणि त्यांच्यावर लिहायला माझी बोटं मोबाईलच्या स्क्रीन वर फिरायला लागली.

समाजक्रांती परिवाराच्या माध्यमातून या समाजसेवकाने स्वतःच्या पगारातील आणि शेतीच्या उत्पन्नातील हजारो रुपये अडगळीत सापडलेल्या गोरगरिबांना त्यांच्या झोपडीत जाऊन दिले आहेत

प्रत्येकाला 11 हजाराची मदत हा माणूस करत असतो. कुणाचा नवरा दारू पिऊन मरण पावला, कुणाचा बाप कर्जाच्या ओझ्याखाली झाडाला लटकून मेला, कुणाच्या घरातील कर्ता पुरुष काळाने हिरावून नेला, कुणाला पैशा अभावी शिक्षणाला मुकावे लागते आहे अशा सर्वांना खातरजमा करून खऱ्या गरजवंताला मदत करून समाजातील इतरांनी अशांना मदत करावी हा संदेशच हा माणूस देतो.

स्वतःचा संसार व्यवस्थित,चांगली नोकरी.



पंचायत समिती म्हटली की नाहकच्या कटकटी तर असतातच मात्र ह्या सगळ्या बाबी बाजूला सारत या दिलदार माणसाने आपल्या संसाराची व्याप्ती वाढविली आहे.

**जे का रंजले गांजले| त्यासी म्हणे जो आपुले ||**
**तोचि साधू ओळखावा | देव तेथे चि जाणावा ||**
**मृदू सबाह्य नवनीत | तैसे सज्जनांचे चित्त ||**
**ज्यासी आपंगीता नाही | त्यासि धरी जो हृदयी ||**
**दया करणे जे पुत्रासी | ते चि दासा आणि दासी ||**
**तुका म्हणे सांगू किती ? | तो चि भगवंताची मूर्ती ||**

या तुकोबांच्या अभंगातील प्रत्येक ओवीशी साधर्म्य असणारा आणि रंजल्या गांजल्यांना आपुले म्हणणाऱ्या या माणसाने कुठल्याही प्रसिद्धीची हाव न करता अथवा आयुष्यात कुठलीही निवडणूक लढवायची नसतांना देखील तुकडोजींच्या विचारांचा पगडा आपल्यावर बिंबवला आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे विचार तरुण पिढीला समजावेत म्हणून विद्यार्थ्यांना आणि लोकांना ग्रामगीता देऊन तुकडोजी महाराज यांच्या कार्याचा व विचारांचा प्रचार आणि प्रसार देखील ते करत असतात. रासायनिक शेती करून शेतकऱ्यांनी आर्थिक दृष्ट्या न फसता सेंद्रिय शेती करावी हा लोकनायक प्रकाशभाऊ पोहरे यांचा विचार सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहचवून गावागावात शेतीचे गट निर्माण करून सेंद्रिय शेतीसाठी त्यांना प्रवृत्त करण्याचे काम ते अव्याहतपणे करत आहेत.

हेल्मेट शिवाय दुचाकीवर जाणाऱ्या मजुरांना हेल्मेट घेऊन देणारा,तुकडोजी महाराजांचे विचार लोकांपर्यंत पोहचवून त्या विचारांवर वाटचाल करणारा आणि दातेपण अंगी असलेला अधिकारी म्हणून गजानन पाटोळे यांना ओळखल्या जाते.

शेतकऱ्यांची मुले अधिकारी झाली की ती शेतकऱ्यांसोबत देखील व्यावहारिक वागायला लागतात. त्याच काळ्या आईची सेवा करून मायबापांनी आपल्याला अधिकारी पदापर्यंत नेऊन पोहचविले.याची जाणीव ठेवून निदान शेतकरी व सर्वसामान्यासोबत सौजन्याने तरी वागावे अशी माफक अपेक्षा असतांना देखील त्यांना हेलपाटे मारायला लावणारे आणि काहीतरी घेतल्याशिवाय काम न करणारे अनेक अधिकारी बघायला मिळतात.

अशाही वातावरणात सकारात्मकता ठेवत केवळ सहकार्याची भावनांच नव्हे; तर प्रत्यक्ष मदतीचा हात देणारा अधिकारी म्हणून गजानन पाटोळे यांची पंचक्रोशीत ओळख आहे.

वडगाव माळी ता. मेहकर येथील मूळ रहिवाशी असलेल्या या अधिकाऱ्याच्या समाजसेवेची गोडवा च्या माध्यमातून दखल घेण्याची अंतर्मनातून मला मिळालेली प्रेरणा हीच त्यांच्या कार्याची माझ्या दृष्टीने मोठी पावती आहे.

# गडकिल्ल्यांची जोपासना करण्याचा संकल्प



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक 6 जून 1674 ला झाला.त्या निमित्ताने दरवर्षी 6जूनला शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो.छत्रपती शिवाजी महाराजांचा 350 वा राज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने राजकीय पुढाऱ्यांनी काही तरी शिकवन घेतली पाहिजे. आज महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाचे सर्वेसर्वा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजच.राज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने राज्यात वाढता अत्याचार,भ्रष्टाचार, महागाई, बेरोजगारी,गरीबी यावर अंकुश लावण्यासाठी सरकारने सर्वोतोपरी प्रयत्न केले पाहिजे. त्याचबरोबर शिवरायांचे ब्रिदवाक्य लक्षात ठेवले पाहिजे ते म्हणजे "भुकेलेल्यांना अन्न व प्रजेची सेवा" यापध्दतीने सरकारची वाटचाल असायला पाहिजे.**

यातुनच आपल्याला शिवाजी महाराजांचे खरे दर्शन घडुन येईल.शिवरायांचे स्वप्न साकार करण्यासाठी सरकारने संपूर्ण गडकिल्ल्यांची जोपासना करावी. महाराजांनी रयतेच्या जीवांसाठी मोगलांशी दोन-दोन हात केले तेव्हाच हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली.त्यामुळे सरकारने शिवाजी महाराजांचे आदर्श सामोरं ठेवुन जनतेच्या सुख-दुःखात सहभागी व्हायला पाहिजे.शुक्रवार 19फेब्रुवारी 1630साली शिवाजी महाराजांचा जन्म झाला.त्यामुळे दरवर्षी शिवजयंती 19 फेब्रुवारीला साजरी केली जाते. त्याचप्रमाणे इतर संभाव्य तारखांमध्ये 6 एप्रिल 1627( वैशाख शुद्ध तृतीया ) ही सुद्धा जन्म तारीख मानली जाते.त्यानुसार महाराष्ट्राबाहेर अनेक लोक शिवजयंतीचा दिवस म्हणून वैशाख शुद्ध तृतीया हा दिवस मानतात.महाराष्ट्रात शिवजयंतीच्या तारखेला महत्व नसुन त्यांचे कर्तुत्व,त्यांचा त्याग,रयतेची जबाबदारी आणि लाखोंनी सैन्य घेऊन चढाई करणाऱ्या मोगल साम्राज्याचा अंत करणे हे महत्वाचे होते.ज्याप्रमाणे शिवजयंती घराघरात साजरी केली जाते त्याचप्रमाणे "राज्याभिषेक सोहळा"घराघरात साजरा व्हायला पाहिजे.शिवाजी महाराजांची जन्मतारीख किंवा राज्याभिषेकची तारीख याला महत्व न देता शिवाजी महाराज आपल्या अंतःकरणात व हृदयात कसे बसेल याकडे सर्वांनीच लक्ष देण्याची गरज आहे.आजच्या परीस्थितीत शिवाजी महाराजांचे आचरन अंगीकारतांना जनतेच्या सेवेला व समस्यांना महत्व देण्याची गरज आहे.यातच आपल्याला खरा श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा दिसून येईल.शिवाजी महाराजांइतकी सेवा कोणीही करू शकत नाही.परंतु खासकरून राज्यकर्ते व राजकीय पुढाऱ्यांना मी सांगू इच्छितो की जनतेच्या समस्या,भुकेलेल्यांना अन्न, रोजगार याकडे जरी लक्ष दिले तर शिवाजी महाराजांचे स्वप्न अवश्य साकार होईल असे मला वाटते.जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकार-पाताळ आहे तोपर्यंत शिवाजी महाराजांचा जयजयकार घराघरात व सर्वांच्या हृदयात आपल्याला दिसुन येईल.मी तर म्हणेल की शिवजयंती किंवा राज्याभिषेक सोहळा रोज साजरा व्हावा आणि शिवाजी महाराजांचे गोडवे जनतेपर्यंत पोहचवावे. तेव्हाच भारतात एकच नाही तर लाख शिवाजी तयार होतील.कारण सर्वांनाच कल्पना आहे की एक मावळा हजार मोगलांवर भारी पडत असे तेव्हाच संपूर्ण गडकिल्ले शिवाजी महाराजांना जिंकता आले.कारण त्याकाळी मोगलांना प्रत्येक मावळा शिवाजी वाटत असे यामुळेच मोगल छत्रपती शिवाजी महाराजांपासुन भयभीत होते. शिवाजी महाराजांच्या पुण्यांयीनेच आज आपण ताठ मानाने,स्वाभिमानाने जगत आहोत व मोकळा श्वास घेत आहोत.शिवाजी महाराजांनी गनीमीकाव्याने मोगलायीचा व मोगल साम्राज्याचा अंत केला व हिंदवी स्वराज्याची स्थापना केली.त्यामुळे मोठ्या थाटात व उत्साहाने शिवराज्याभिषेक सोहळा साजरा केला जातो.

याचा गर्व महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे.आज भारताची गौरव गाथा जी आपण ऐकतो त्याचे संपूर्ण श्रेय शिवरायांनाच आहे.शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्रासह संपूर्ण भारताची अबाध्य शक्ती आहे. शिवराज्याभिषेकच्या निमित्ताने शिवाजी महाराजांचे विचार समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचले पाहिजे.जानता राजा, रयतेचा राजा,हिंदवी स्वराज्याचे संस्थापक म्हणून जगभर ख्याती प्राप्त आहे.त्यामुळे केवळ महाराष्ट्रातच किंवा भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात शिवाजी महाराजांचे नाव आदराने घेतले जाते.तत्वज्ञ, इतिहासकार शिवाजी महाराजांवर अभ्यास करण्यासाठी भारतात येतात.19फेब्रुवारी रोजी सुमारे 111 पेक्षा अधिक देशांमध्ये शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात येते.असे सांगण्यात येते की शिवाजी महाराजांकडे अनेक जातीवंत घोडे सुध्दा होते.कोणत्या घोड्यांचा वापर केव्हा करायचा हे त्यांना चांगलेच अवगत होते. शिवाजी महाराजांकडे मोती, विश्वास,तुरंगी, इंद्रायणी,गाजर,रणभीर,कृष्णा असे 7 घोडे होते. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करतांना सुमारे 400 गड आपल्या अधिपत्याखाली आणले होते.काही गड त्यांनी स्वतः बांधले तर काही किल्ले लढाया करून जिंकले. महाराजांचा एक गडकिल्ला म्हणजे स्थापत्यशास्त्र, व्यवस्थापन आणि गनिमी काव्याचे प्रतिकच होते. त्यामुळे मी सरकारला आग्र करतो की महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ल्यांची देखरेख करून सुसज्जीत केले पाहिजे.यातुनच शिवरायांना खरा मानाचा मुजरा ठरेल. कारण गडकिल्ले महाराष्ट्राची आण-बाण-शान आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रासह संपूर्ण



भारतातील गडकिल्ले ही भारताची धरोहर आहे. कारण गडकिल्ल्यामुळेच शिवरायांच्या आठवणी पुन्हा-पुन्हा जागृत होतात व नवीन उर्जा निर्माण होते. गडकिल्यांची सुरक्षा म्हणजे शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या निमित्ताने महाराजांना खरे अभिवादन व मानवंदना ठरेल.कारण शिवरायांनी मुठभर मावळ्यांच्या साक्षीने हिंदवी स्वराज्याची स्थापना केली व संपूर्ण किल्ले काबीज केले हा अभिमान महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे. त्यामुळे इतिहास जागृत ठेवण्यासाठी संपूर्ण किल्ले पर्यटनाच्या दृष्टीने व शिवरायांची आठवण या उद्देशाने किल्ल्यांची जोपासना करणे गरजेचे आहे. कारण शिवाजी महाराज रयतेचे राजा होतेच.परंतु त्यांच्यात दैवी शक्ती सुध्दा होती.393 वर्षांनंतर आजही कुठल्याही गडकिल्ल्यांवर गेले तर 4 हजार फूट उंचीवर भर उन्हाळ्यात आपल्याला किल्ल्यावर स्वच्छ पाणी प्यायला मिळते.हा संपूर्ण शिवरायांचाच प्रताप आहे.असे सांगण्यात येते की वयाच्या 17 व्या वर्षी शिवरायांनी स्वतः डिझाईन करून रायगड किल्ला बांधल्याचे सांगण्यात येते. आई जगदंबेच्या आशीर्वादाने शिवाजी महाराजांनी आपले संपूर्ण काम फत्ते केले व मावळ्यांमध्ये उर्जा निर्माण करून मोगलांना भुईसपाट केले. अबझल खानासारख्या महाकाय शक्तीशाली सरदाराला गनीमीकाव्याने यमलोक पोहचवीले. अशाप्रकारे मोगलांच्या संपूर्ण सरदारांना एक-एक करून यमलोक पोहचवीण्याचे काम शिवरायांनी, त्यांच्या सरदारांनी आणि मावळ्यांनी केले.हा देश साधुसंतांचा,थोरमहात्म्यांचा, क्रांतीकारकांचा व हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या शिवरायांचा देश आहे.याची जोपासना महाराष्ट्र व केंद्र सरकारने करावी अशी मी आग्रहाची विनंती करतो.देशात वाढते अत्याचार रोखण्यासाठी, शेतकरी व कामगारांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी शिवरायांच्या तत्त्वांच्या अनुकरणाचा वापर करून केंद्र व राज्य सरकारने रयतेच्या सुरक्षेची जबाबदारी स्वीकारावी व महागाईच्या रूपात निर्माण झालेल्या मोगलांचा सर्वनाश करून रयतेला दिलासा द्यावा.यातच खरे शिवराज्याभिषेकाचे महत्त्व दिसून येईल.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 14 किल्यांना संयुक्त राष्ट्रसंघाच्या शिक्षण, विज्ञान आणि सांस्कृतिक विभागाने म्हणजे युनेस्कोने आंतरराष्ट्रीय वारसास्थळ (वर्ल्ड हेरिटेज साईट) म्हणुन मान्यता दिली आहे. यामुळे जगात महाराष्ट्राची मान आणखी उंचावली आहे.6 जुन शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्याने महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीने आरोग्याच्या दृष्टीकोनातून व वाढते प्रदूषण लक्षात घेता पर्यावरणाला वाचविण्यासाठी आजच्या दिवसाला मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्याचा संकल्प करावा.यामुळे महाराष्ट्रात हिरवागार गालिचा निर्माण होईल व संपूर्ण गडकिल्ले हिरवेगार दिसतील.

# सहा-सहा जिल्ह्यांना एक पालकमंत्री; प्रशासन ठप्प, जनता वाऱ्यावर : पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दिल्लीच्या इशाऱ्यावरच काम करतात. दिल्लीकरांनी सांगितल्याशिवाय हे एकही निर्णय घेऊ शकत नाहीत. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री दिल्लीचे हस्तक असून त्यांचा एक पाय कायम दिल्लीतच असतो, अशी घणाघाती टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.
पत्रकारांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतःच औरंगाबादच्या सभेत मोदी-शहांचे हस्तक आहोत असे जाहीरपणे सांगितले आहे. आता ते दिल्लीत मंत्रिमंडळ विस्तारासाठी गेलेत अशी चर्चा आहे कारण दिल्लीला विचारल्याशिवाय यांचे पानही हलू शकत, राज्यकारभार करणे तर दुरची गोष्ट आहे. वर्षभरापासून अनेक विभागांना मंत्री नाहीत, एका-एका मंत्र्यांकडे सहा-सात खात्यांचा कारभार आहे तर सहा-सहा जिल्ह्यांना एकच पालकमंत्री आहे, यामुळे राज्यातील प्रशासन ठप्प झाले आहे. मंत्री कोणत्याच विभागाला न्याय देऊ शखत नाहीत. प्रशासन ठप्प असून कामकाज होत नाही त्यामुळे जनता त्रस्त आहे. लोकांची कामं होत नाहीत पण शिंदे-फडणवीस सरकारला त्याची चिंता नाही.
राज्यात आज अनेक भागात पाण्याची तीव्र टंचाई आहे, शेतकरी हवालदिल आहे, अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे झालेल्या नुकसानीची मदत अजून शेतकऱ्यांना मिळालेली नाही. शेतमाल रस्त्यावर टाकण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे, कापूस अजूनही शेतकऱ्यांच्या घरातच पडून आहे. पण शिंदे सरकारला त्याचे काहीही देणेघेणे नाही. मोठ-मोठ्या घोषणा करायच्या आणि केवळ इव्हेंटबाजी करुन जनतेच्या पैशाची लुट करण्याचे काम सुरु आहे. राज्यातील जनता शिंदे-फडणवीस सरकारला कंटाळली असून निवडणुकीत त्यांना घरी बसवेल असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.



# वनविभागातर्फे पर्यावरण दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त धुळे वनविभागातर्फे लळींग लांडोर बंगला येथे वन विभाग उपसंरक्षक नितीन सिंग यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण कार्यक्रम करण्यात आला. व या ठिकाणी पर्यावरण संदर्भात विशिष्ट जनजागृती करण्यात आली. या ठिकाणी वन उपसंरक्षक नितीन सिंग यांनी काही महत्त्वाचे संदेश दिले कि यावर्षी पर्यावरण दिनानिमित्ताने भारत सरकारने मिशन लाईफ हे नवीन स्लोगन दिले आहे. या मिशन लाईफचे ध्येय असे आहे की पर्यावरणात आपले आयुष्य कसे समर्पित केले पाहिजे जसे की प्लास्टिक पिशव्या न वापरता कागदी किंवा कापडी पिशव्या वापराव्यात त्याच्याने खूप मोठ्या प्रमाणात प्लास्टिक प्रदूषण कमी होईल. सध्या भारतात इलेक्ट्रिक वाहने विकसित झाले आहेत त्याचा उपयोग मोठ्या प्रमाणात केला पाहिजे जेणेकरून वायू प्रदूषण कमी होऊ शकते. एअर कंडीशनचा वापर कमी केला पाहिजे किंवा त्याचा वापर न करता आपल्या घराच्या आजूबाजूला असे वातावरण निर्माण करा की नैसर्गिक वातावरणात आपल्याला वापरण्याचे टाळता आले पाहिजे आपल्या पर्यावरणात प्रदूषण कमी होऊ शकते अशाप्रकारे नितीन सिंग यांनी या ठिकाणी जनजागृती केली. या ठिकाणी उपस्थित फॉरेस्ट ऑफिसर महेश पाटील यांनी या ठिकाणी सांगितले की करुणा काळात सर्वांना माहित आहे की झाडांचे महत्त्व काय होते त्यामुळे सर्वांना विनंती करण्यात आली की सर्वांनी एक झाड लावावे व जगवावे जेणेकरून करुणा सारखी परिस्थितीत पुन्हा येऊ नये व ऑक्सिजन साठी असे वाईट दिवस येऊ नये सांगण्यात आले. या ठिकाणी उपस्थित वन उपसंरक्षक वनविभाग नितीन सिंग, रेंज फॉरेस्ट ऑफिसर महेश पाटील, संभाजी गवळी, सुनील परदेशी, साने साहेब, निलेश जगदाळे, रेंज स्टाप : श्री मुकेश सोनार, किशोर पवार, मराठे ,वनपाल : सुरेश जाधव निंबा आखाडे व सर्व वनरक्षक व सर्व कर्मचारी उपस्थित होते.



# एक विद्यार्थी एक झाड उपक्रमास उस्फूर्त प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** येथील विद्याभवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूलच्या सचिव मंगलाताई सोळंके आणि समन्वयक निला देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून ' एक विद्यार्थी एक झाड ' या उपक्रमांतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याला झाडे आणण्याच्या केलेल्या आवाहनास विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला.

सविस्तर वृत्त असे की, शाळेच्या वतीने उन्हाळी उपक्रम म्हणून सर्व विद्यार्थ्यांना जुनमध्ये शाळेत येताना प्रत्येकी दोन झाडे आणण्याचे आवाहन केले होते. या उपक्रमाची विशेषता म्हणजे ही झाडे विद्यार्थ्यांनी एखाद्या रोपवाटिकेतून न आणता स्वतः उन्हाळ्यात आस्वाद घेतलेल्या आंबे, जांभूळ, चिंच इत्यादी झाडांच्या बियांपासून तयार केली आहेत. उन्हाळी सुट्टी नंतर आज दिनांक ५ जुन म्हणजे जागतिक पर्यावरण दिन रोजी शाळा सुरू झाल्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी ही तयार केलेली रोपे शाळेला भेट केली. फक्त विद्यार्थीच नव्हे तर शिक्षकांनी सुद्धा प्रत्येकी पाच झाडे या उपक्रमाअंतर्गत शाळेला भेट दिली. सर्व जमा झालेली झाडे ही शाळेतील मोकळ्या जागेत लावली जाणार आहेत. यासाठी शाळेने सीबीएसई च्या नियमानुसार इको- क्लब स्थापन केला असून शाळेचे शिक्षक विजय फासाटे व अजय सावंत यांच्याबरोबर सर्व सदस्य या उपक्रमाचे नियोजन करणार आहेत. या उपक्रमास विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादासाठी प्राचार्य अन्वर शेख, उपप्राचार्य राहुल कदम सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# यशस्विनी पतसंस्थेमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** यशस्विनी पतसंस्थेमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. पतसंस्थेच्या हडको येथील मुख्य कार्यालयात अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी केली. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा सविता देविदास साधने पाटील यांना विरमगाव ग्रामपंचायतीकडून सामाजिक क्षेत्रात केलेल्या योगदानाबद्दल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार प्रदान करण्यात आला. राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाने ग्रामपंचायतींना हे पुरस्कार देण्यासंबंधी सूचना केली होती. यावेळी सविता अधाने यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, महिलांनी महिलांचे सबलीकरण व सामाजिक कामे केली पाहिजेत. आज ग्रामीण व शहरी भागामध्ये आम्ही सहकार्याच्या माध्यमातून महिलांना रोजगार मिळवून देण्याचा प्रयत्न करतो. त्यांच्यापर्यंत अनेक सरकारच्या योजना मांडत आहोत. महिला पुढे आली तर त्या कुटुंबाला हातभार लागेल. त्यासाठी महिलांनी व्यावसायिक दृष्टिकोन ठेवला पाहिजे; जेणेकरून शेतीवर कुटुंब अवलंबून न राहता शेतीपूरक व्यवसाय केला पाहिजे. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष देविदास अधाने पाटील यांनीही शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# मर्कटलीला दुचाकीस्वाराच्या जीवावर

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** वानरांच्या झाडावरील मर्कटलीला एका दुचाकीस्वाराच्या जीवावर बेतल्या. कळंब ते खुटाळा मार्गाने दुचाकीने जात असताना धावत्या दुचाकीवर वानराने उडी घेतली. चालकाचे नियंत्रण सुटल्याने दुचाकी कोसळून बाप- लेक गंभीर जखमी झाले. उपचारादरम्यान वडिलांचा मृत्यू झाला, तर मुलावर उपचार सुरू आहे. रणजित यादव ( ४५, रा. सोनेगाव ) असे मृताचे नाव आहे. मुलगा ललित यादव ( १६ ) हा जखमी आहे. रणजित यादव व मुलगा ललितसह कळंबवरून खुटाळा मार्ग सोनेगावकडे जात होते. मार्गात त्यांच्या मोटरसायकलवर वानराने उडी घेतली.
अपघातात गंभीर जखमी रणजित यादव यांना सावंगी मेघे येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. रविवारी त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने गावात हळहळ व्यक्त होत आहे.

# तरुणांना उद्यमशील बनवून २०४७ मध्ये स्वावलंबी भारत घडविणार

## स्वदेशी जागरण मंचाच्या राष्ट्रीय परिषदेत संकल्प

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** ४ जून - तरुणांच्या उद्यमशीलतेला प्रोत्साहन देऊन त्यांच्यामधून उद्योजक घडविण्याचा व त्याद्वारे २०४७ मध्ये स्वावलंबी भारत निर्माण करण्याचा संकल्प स्वदेशी जागरण मंचच्या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेत करण्यात आला, अशी माहिती मंचाच्या पदाधिकाऱ्यांनी रविवारी दिली. या दोन दिवसीय बैठकीचा समारोप रविवारी महर्षी कर्वे संस्थेच्या सभागृहात झाला. यानिमित्ताने मंचाचे अखिल भारतीय सह संयोजक डॉ. अश्वनी महाजन, पश्चिम क्षेत्र सह संयोजक प्रशांत देशपांडे, पश्चिम महाराष्ट्र प्रांत संयोजक हेमंत साठे यांनी पत्रकार परिषदेला संबोधित केले. त्यावेळी त्यांनी ही माहिती दिली.
डॉ. महाजन, म्हणाले, की देशातील तरुणांमध्ये प्रतिभा आहे. त्यांच्या या प्रतिभेला वाव देण्यासाठी जिल्हा रोजगार सृजन केंद्राची स्थापना करण्यात येणार आहे. देशातील ७५६ जिल्ह्यांमध्ये अशी केंद्रे स्थापन करण्यात येणार असून त्यांपैकी ४३० केंद्रे स्थापनही झाली आहेत. त्यांना बळकट करण्यासाठी १ ते ३० जून या कालावधीत सघन संपर्क अभियान राबविण्यात येणार आहे. तसेच "माय एसबीए" डिजिटल कॅम्पेन या अभियानालाही चालना देण्यात येईल. विशेषतः महिलांमध्ये उद्यमशीलता वाढविण्यासाठी स्वावलंबी भारत अभियानांतर्गत प्रयत्न करण्यात येतील, येत्या २१ ऑगस्ट रोजी जागतिक उद्योजकता दिवसाच्या निमित्ताने अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या सहकार्याने शाळा, महाविद्यालय व विद्यापीठांमध्ये कार्यक्रम आयोजित करण्यात येतील. तसेच नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यात देशभरात 50 हून अधिक ठिकाणी स्वदेशी स्वावलंबन मेळावे आयोजित करण्यात येतील.

**विज्ञान आणि आर्थिक प्रगतीत हवा समन्वय :** दोन दिवसांच्या या बैठकीत एकूण सात सत्रे झाली . यामध्ये विविध विषयांवर मंथन झाले . बैठकीत एक प्रस्तावही मंजूर करण्यात आला . या प्रस्तावात म्हटले आहे की, आपण विज्ञान आणि आर्थिक प्रगतीमध्ये सामंजस्यपूर्ण संबंध सुनिश्चित केले पाहिजेत . एकात्म मानववादाच्या तत्त्वांचे पालन करून विज्ञान वरदान ठरला हवे, ते शाप ठरू नये . वर्ष 2047 मधील भारताचे लक्ष्य एका अशा विकासाचा संकल्प आहे जो ग्रामीण रोजगार आणि पर्यावरणावर केंद्रित असेल . तसेच मूल्य, नैतिकतेचे सिद्धांत, सहकार आणि विकेंद्रीकरण यांच्यावर आधारित असेल .

या बैठकीस १६ संघटनांचे प्रतिनिधी आले असून त्यात ३८ प्रांतामधून २३० पदाधिकारी ज्यात ३८ महिलांचा समावेश होता. या बैठकीत मंचाच्या पुढील एक वर्षाच्या वाटचालीची रूपरेषा ठरविण्यात आली. स्वदेशी जागरण मंचाच्या उपक्रमांमध्ये पर्सिस्टंट टेकनॉलॉजीज, जागृती आणि सेपियो, सेवावरधीनी यांसारख्या संस्था आणि कंपन्यांचे सहकार्य लाभले आहे, असेही यावेळी सांगण्यात आले.
या परिषदेच्या निमित्ताने स्वदेशी जागरण मंचाच्या वतीने दोन निवेदने प्रसिद्ध करण्यात आली. पहिल्या निवेदनात म्हटले आहे, की २०४७ मधील भारताने समर्थ उत्पादन व्यवस्था तयार केली पाहिजे आणि



अमेरिकी डॉलरच्या तुलनेत रूपयाची घसरण थांबवायला हवी. भारतीय चलनाला प्रोत्साहन देऊन आंतरराष्ट्रीय बाजारात भारतीय वस्तू आणि सेवांची निर्यात अधिक स्पर्धात्मक बनवायला हवी. दुसऱ्या निवेदनात म्हटले आहे, की जी - 20 गटाचे अध्यक्षयद ही भारतासाठी एक सुसंधी असून त्याद्वारे जगाला आज भेडसावणाऱ्या समस्यांवर उपाय शोधता येतील जागतिक व्यापार संघटनेत होत असलेल्या विविध मुद्यांवरील चर्चामध्ये एकमत घडवून आणण्यासाठी भारताने या व्यासपीठाचा उपयोग करावा.



# ग्रा.पं.ने भागवली राजूरकरांची तहान

## उन्हाळ्यातही वार्डनिहाय नियमित पाणीपुरवठा

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा.बाळासाहेब बोराडे**

**श्रीक्षेत्र राजूर :** उन्हाळा सुरू झाला की अनेक गावांना पाणीटंचाईच्या झळा सहन कराव्या लागतात. विहिरी अधिग्रहण करून वाड्या-वस्त्यांवर टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो.त्यामुळे प्रशासन यंत्रणेवरही ताण येतो. परंतु राजूर गावं यास अपवाद आहे.

ग्रामपंचायत नियोजनातून राजुर हे मागील काही वर्षापासून टँकर मुक्त झाले आहे. कडक उन्हाळ्यातही वार्डनिहाय नियमित पाणीपुरवठा करून ग्रामपंचायतीने राजूरकरांची तहान भागवली आहे.

मागील दुष्काळी परिस्थितीत राजुरकरांनी पाणीटंचाईच्या झळा सोसल्या आहेत. रात्री-अपरात्री पाण्यासाठी जागर करावा लागत असे.उन्हाच्या रखरखीत अनवाणी पायाने हंडाभर पाण्यासाठी पायपीट करावी लागत होती.विकतच्या पाण्याशिवाय पर्याय नव्हता. टँकर लॉबी फोफावली होती. सामान्य माणसांची दिवसभरातील अर्धी कमाई पाण्यावर खर्ची होत होती.एवढा आटापिटा करूनही पाणी मिळेल की नाही याची शाश्वती नव्हती.

आजमितीला श्रीक्षेत्र राजूरचे चित्र पालटले आहे.केंद्रीय रेल्वेमंत्री ना.रावसाहेब पाटील दानवेंचे मार्गदर्शन आणि ग्रामपंचायत नियोजनातून ग्रामस्थांनी पाणीटंचाईवर मात केली आहे. दानवेंच्या प्रयत्नातून अनेक योजना खेचून आणल्या आहेत. राजुरसाठी बाणेगाव प्रकल्प पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून ४८ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून खर्च करण्यात आला आहे. जलजीवन मिशन अंतर्गत १० कोटी रुपयांची कामे सुरू झाली आहेत. त्या माध्यमातून बाणेगाव धरणात स्वतंत्र विहीर, २५ किमीची पाईपलाईन, ४ जलकुंभातून ७ लक्ष लिटर क्षमतेत वाढ झाल्याने ग्रामस्थांना मुबलक प्रमाणात पाणी मिळत आहे. त्यामुळे उन्हाळ्यातही राजूरकरांची तहान भागत आहे.

**पाण्याचा वापर जपून करा : सरपंच प्रतिभा भुजंग**



राजूरसह परिसरातील गावांना बानेगाव प्रकल्पातून पाणीपुरवठा होतो . शेतीसाठीही पाणी उपस होतो .धरणावर मर्यादा येत आहेत .कडक उन्हामुळे नैसर्गिक जलस्रोत अटत गेले .विहिरींनी तळ गाठला .धरणातील पाणी पातळी कमी झाली .वेळेवर पाऊस न पडल्यास पाणीटंचाईची समस्या भेडसावू शकते .म्हणून पाण्याचा जपून वापर करावा असे आवाहन सरपंच प्रतिभा भुजंग यांनी ग्रामस्थांना केले .

# शाळेच्या पहिल्याच दिवशी नवीन पाठ्यपुस्तक

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथे महाराष्ट्र शासनाच्या मोफत पाठ्यपुस्तक वितरण योजनेअंतर्गत 2023 -24 च्या मोफत पाठ्यपुस्तक वितरणास पंचायत समिती,शिक्षण विभाग, कन्नडच्या वतीने शुभारंभ करण्यात आला.

यावर्षीचे नवीन शैक्षणिक वर्ष येणाऱ्या 15 जून पासून सुरुवात होणार आहे आणि शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हातात नवीन पाठ्यपुस्तक मिळावे यासाठी कन्नड शिक्षण विभागाच्या वतीने अत्यंत काटेकोर नियोजन करून तालुक्याच्या 20 केंद्रात वेळेत पुस्तक वितरण व्यवस्था करण्यात आली आहे. पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी शेषराव गंडे साहेब विस्तार अधिकारी नारायण भुजाडे, श्रीमती वेरूळकर, दवंगे, बहिरगाव केंद्राचे केंद्रप्रमुख चव्हाण बहिरगाव केंद्राचे केंद्रीय मुख्याध्यापक योगेश पाटील, चिकलठाण केंद्राचे केंद्रप्रमुख अजिज शहा चिकलठाणचे शिक्षक संदीप राजपूत पाठ्यपुस्तक वितरण व्यवस्थाचे भुसारी व इतर मान्यवर उपस्थित होते. योजना शुभारंभ प्रसंगी बहिरगाव व चिकलठाण या केंद्रांना पाठ्यपुस्तक वितरित करून करण्यात आला.



# पावसाळ्याच्या आधीच लोणार शहरात विद्युत पुरवठ्याचा लपंडाव सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** ४ जून 2023 रोजी दुपारी दोन वाजता अचानक वादळी वाऱ्याने सुसाट वेगाने वारा सुटल्यामुळे मेहकर लोणार विद्युत पुरवठ्यावर जवळील झाडे तुटून विद्युत लाईनीवर पडल्यामुळे विद्युत पुरवठा खंडित झाला लोणार शहराची व तालुक्याची विद्युत पुरवठा खंडित झाल्यामुळे शहरवासीयांना तब्बल सात तास विद्युतपुरवठा खंडित असल्यामुळे त्रास सहन करावा लागला. लग्नसराईचे दिवस, उन्हाळ्याची भयानक गर्मी अशा परिस्थितीत विद्युत पुरवठ्याची साथ नाही लोणारला विद्युत पुरवठा बंद झाल्यावर लोणार ला विद्युत पुरवठा देण्यासाठी कोणतीही पर्याय व्यवस्था नाही लोणार मेहकर विद्युत पुरवठ्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या आजूबाजूची झाडांची फांद्या तोडण्यात यावी जेणेकरून मान्सून पूर्व व पावसाळा भर विद्युत पुरवठा खंडित होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी अशी मागणी जनतेकडून कडून होत आहे.



लोणारची सतत विद्युत पुरवठा खंडित होत असल्यामुळे नळाच्या पाण्याची दूर व्यवस्था होत आहे विद्युत पुरवठा सुरळीत राहिल्यास नळाचे पाणी देण्यास नगरपालिका सक्षम आहे .

**पुनम पाटोळे अध्यक्ष नगरपरिषद लोणार**

लोणार शहरात विद्युत पुरवठा नेहमी खंडित होत आहे व्यापारी व जनता परेशान आहे व्यापार ठप्प होऊन राहिलेले आहे नगरपालिकेच्या समोर पाणीपुरवठा कसा करावा व जनतेचे आक्रोश कसे थांबवावे हा प्रश्न उभा राहिलेला आहे

**शेख समद, शहराध्यक्ष भारतीय राष्ट्रीय काँग्रेस लोणार**

हवेची थोडीशी झुरळ जरी आली तरी लोणार शहरातील विद्युत पुरवठा आठ आठ तास खंडित राहतो याची दखल कोण घेणार अधिकारी आपले मोबाईल नॉट रिचेबल करून ठेवतात . **डॉक्टर भास्कर मापारी**



# चणेगाव येथे गोपीनाथ मुंडे यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** राजूर येथून जवळच असलेले मौजे चनेगांव येथे लोकनेते स्व. गोपीनाथ मुंढे यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळेस ग्रामस्थ तसेच मुंडे समर्थकांनी लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकण्यात आला. गोपीनाथ मुंडे हे एक संघर्ष योद्धा होते. त्यांच्याकडे संघटन कौशल्य होते. त्यांनी सर्व समाज घटकातील बांधवांना सोबत घेऊन सामाजिक, राजकीय नेतृत्व केले. आजही सर्वांना त्यांच्याबद्दल आदर आहे. स्व. गोपीनाथ मुंडे हे जरी आपल्यात नसले तरीही त्यांचे कर्तृत्व आणि नेतृत्व अमर आहे.अशा शब्दांत त्यांच्या कार्याचा गौरव केला.

यावेळी सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य, माजी सरपंच तसेच शेषराव जायभाये, सदाशिव घुगे, तंटामुक्ती अध्यक्ष पुंजाराम निहाळ, सामाजिक कार्यकर्ते जीवन घुगे, माधव जायभाये, प्रकाश जायभाये, परमेश्वर कायंदे, दीपक जायभाये, कृष्णा घुगे, बळीराज घुगे, मदन सानप, पवन घुगे, रामा घुगे, ज्ञानेश्वर जायभाये,भगवान घुगे, बाळू घुगे, दत्ता घुगे, विठ्ठलराव घुगे यांच्यासह ग्रामस्थांच्या वतीने लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांना अभिवादन करण्यात आले.

# अहिल्याबाई होळकरांचा आदर्श घ्यावा : प्रा.डॉ. जायभाये

आधुनिक केसरी न्यूज

**धारूर :** बीड जिल्ह्याच्या धारूर तालुक्यातील मौजे कुंडी येथे संपन्न झालेल्या राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या २९८ व्या जयंती निमित्ताने महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध विचारवंत, लेखक, कवी, प्रबोधनकार, व्याख्याते प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये बोलत होते. कुंडी येथील जय मल्हार युवा मित्रमंडळाने राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंतीचे मोठ्या थाटात आयोजन केले होते. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्ष श्री माऊली तात्या गडदे, प्रमुख पाहुणे श्री दत्तात्रय मायंदळे, ॲड.सतीश काळे, सरपंच शिवाजी काळे, मुन्ना काळे सर, दिनेश काळे, धनराज डुकरे, अमोल टरपले, श्री बिडगर, श्री पवार आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी सर्वांनी मातेच्या चरित्रावर प्रकाश टाकला. शेवटी जयंतीचे प्रमुख व्याख्याते प्रा.डॉ.जायभाये यांनी आपल्या दिड तास चाललेल्या व्याख्यानात उपस्थितांना विचार प्रवण केले. मोठ्या संख्येने माता-भगिनीच्या उपस्थितीत



स्त्रियांनी अहिल्या मातेसारखी आपली फौज उभी करायला हवी. स्वसंरक्षणाची जबाबदारी उचलून खंबीर व्हायला हवे. येणारा काळ खडतर असून आपल्या मुलींना उच्च शिक्षित करावे, मुलांना निर्व्यसनी ठेवावे लागेल. प्रत्येकाला नौकरी मिळणार नसून शेती पूरक जोडधंदे विकसित करून तरुणांनी व्यावसायिक व्हावे लागेल. व्यसन आणि मोबाईल यापासून सावध रहावे लागेल. त्याचबरोबर लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे साहेबांसारखे सर्वसमावेशक राजकारण करून तळागाळातील लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करावा लागेल. रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम या महामानवांच्या पावलावर पाऊल टाकून आज आपण चालायला हवे. असे झाल्यास महापुरुषांची जयंती-पुण्यतिथी साजरी केल्याचे खऱ्या अर्थाने सार्थक होईल. सायंकाळी मातेच्या प्रतिमा मिरवणुकीत एकाही कार्यकर्त्याने दारू पिऊन नाचू नये. महापुरुष नाचून नाही तर वाचून घेण्याचे कळकळीचे आवाहन डॉ.जायभाये सरांनी उपस्थितांना केले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्र संचालन आणि आभार कुंडीचे जेष्ठ नागरिक आणि नितीन महाविद्यालय, पाथरी येथे कार्यरत असलेले प्रा.डॉ.तुलसीदास काळे सरांनी केले. याप्रसंगी कुंडी गावचे सरपंच श्री सुधीर जायभाये यांची प्रमुख उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वीपणे घडवून आणण्यासाठी जयंती उत्सव समिती अध्यक्ष श्री बाबा काळे, उपाध्यक्ष श्री गणेश काळे, संतोष काळे, अशोक काळे, किशनराव काळे, कृष्णा काळे, मारोतराव जायभाये, श्रीराम कांगणे, मदन काळे व सर्वच कुंडी येथील जय मल्हार युवा मित्र मंडळ यांनी परिश्रम घेतले. शेवटी अहिल्यादेवी होळकर मातेच्या जयघोषाने कार्यक्रमाची सांगता झाली. याप्रसंगी पंचक्रोशीतील अहिल्यादेवीप्रेमी, मान्यवर आणि कुंडी गावातील महिला, आबालवृद्ध मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘मोस्ट वाँटेड’ नक्षलवादी नेता सुदर्शनचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** तत्कालीन आंध्रप्रदेशातील रहिवासी आणि नक्षलवादी चळवळीत केंद्रीय समिती व पॉलिट ब्यूरो सदस्य असलेल्या सुदर्शन कटकम उर्फ आनंद याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. तो ६९ वर्षाचा होता. त्याच्यावर शासनाने ८० लाखांचे बक्षीस ठेवले होते. मागील कित्येक वर्षांपासून तो पोलिसांसाठी ‘मोस्ट वॉन्टेड’ होता. यासंदर्भात नक्षलवाद्यांनी पत्रक काढून माहिती दिली आहे.

आंध्र प्रदेशातील आदिलाबाद जिल्ह्यातील बेल्लमपल्ली गावात जन्मलेल्या सुदर्शन याने खाणकाम अभ्यासक्रमात शिक्षण घेतले होते. १९७८ मध्ये तो नक्षलवादी चळवळीत सक्रिय झाला. सुरवातीला आदिलाबाद जिल्हा सचिव म्हणून कार्यरत सुदर्शनने १९८५ मध्ये दंडकारण्यात प्रवेश केला. त्याच्याकडे गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा पथकाचे नेतृत्व सोपवण्यात आले. दंडकारण्यात पाठविण्यात आलेल्या सात पथकापैकी ते एक होते. पुढे याचा विस्तार छातीसागड राज्यातील बस्तरपर्यंत झाला. त्याने आदिलाबाद,गडचिरोली,बस्तर ते पूर्व गोदावरीपर्यंत विस्तारित ‘रिट्रीट झोन’ तयार करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. तो सीपीआय-एमएल पीपल्स वॉरच्या ‘वन संपर्क समिती’ सदस्य होता. १९९५ मध्ये त्याची नव्याने स्थापन झालेल्या ‘उत्तर तेलंगणा स्पेशल झोनल कमिटी’च्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली.

# कल्पना म्हापूसकर यांचा कल्पदीप काव्यसंग्रह प्रकाशित

आधुनिक केसरी न्यूज

**बोरिवली :** साहित्यसंपदा प्रकाशनातर्फे कल्पना म्हापूस्कर ह्यांचा कल्पदीप काव्यसंग्रह दिनांक ३.६.२०२३ रोजी जेष्ठ नागरिक सेवा संघ बोरिवली येथे प्रकाशित झाला. अवघ्या तीन वर्षात ५७ पुस्तके साहित्यसंपदा प्रकाशनातर्फे प्रकाशित झाली आहेत. सुप्रसिद्ध लेखिका स्वाती चांदोरकर ह्यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन पार पडले. मराठी साहित्यातील अजरामर पर्व व. पु. काळे ह्यांच्या त्या कन्या असून, प्रकाशनाच्या निमित्ताने व. पुं.च्या स्मृतींना उजाळा मिळाला. श्रोत्यांना त्यांच्याशी संवाद साधता आला. प्रकाशन सोहळ्यास साहित्यसंपदा संस्थापक वैभव धनावडे, जेष्ठ पत्रकार रवींद्र देशमुख, लेखिका स्वाती शृंगारपुरे, निवेदिका पूजा काळे ह्यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. योगेश गोतारणे ह्यांच्या खुमासदार निवेदनाची साथ कार्यक्रमास लाभली आणि कार्यक्रम बहारदार झाला. काव्यसंग्रह प्रकाशनाच्या निमित्ताने "कल्पदीप" संग्रहातील निवडक कवितांचे वाचन कवींनी केले. कविता मनातली पुस्तकाच्या कवयित्री कविता झुंजारराव, मनातली पाने पुस्तकाच्या कवयित्री सलोनी बोरकर ह्यांनी पुस्तक प्रकाशनास शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे विष म्हणजे मराठी साहित्यासाठी झटू पाहणाऱ्या नवतरुण कवींची लाभलेली साथ प्रदीप बडदे, प्रमोद सूर्यवंशी, श्रीशैल सुतार, गणपत चव्हाण, चंद्रशेखर परांजपे, सरोज गाजरे, किशोरी पाटील, जागृती नाईक ह्यांच्या भेटीतून मिळालेला आनंद वेगळाच होता. साहित्यासाठी ह्यांची असलेली तळमळ नक्कीच पुढील पिढ्यांना सक्षम बनवेल ह्यात शंका नाही. पुस्तक प्रकाशन सोहळ्याला कल्पना म्हापुसकर यांच्या उत्कर्ष मंदिर, मालाड शाळेतील मित्रमंडळी व शाळेच्या मुख्याध्यापिका/ शिक्षिका सौ.रोहिणी पाटील या आवर्जून उपस्थित राहिल्या होत्या. त्याप्रसंगी शाळेच्या आठवणींना उजाळा मिळाला.



अजून एक नमूद करण्यासाठी बाब म्हणजे पेडणेकर ह्यांची त्यांच्या मुलासोबत गौरांग किसन पेडणेकर सोबत असलेली उपस्थिती. मुलांना लहान वयात असे कार्यक्रम दाखविणे. थोरा मोठ्या साहित्यिकांची ओळख करून देऊन त्यांचे आशीर्वाद घेऊन देणे. पुस्तकांची ओळख करून देऊन मराठी भाषा संवर्धनासाठी त्यांना तयार करणे अशी अनेक उद्धिष्ट ह्या माध्यमातून पार पडली असे मनोमन वाटते. अश्या सुजाण पालकांचे खूप कौतुक. कल्पनाताईंचा मुलगा यतीन म्हापुसकर यांनी पुस्तक प्रकाशनासाठी विशेष पुढाकार घेऊन प्रकाशनाची जबाबदारी पार पाडली.



# आयशा शेखची इंडियन नेव्हीमध्ये निवड; आ. बागडे यांच्या हस्ते सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** वाहेगाव येथील भाजपा महिला आघाडीच्या कार्यकर्त्या शेख परवीनबी यांची मुलगी आयशा शेख हीची भारतीय नौदल ( इंडियन नेव्ही ) मध्ये निवड झाल्याबद्दल माजी विधानसभा अध्यक्ष तथा आमदार श्री. हरीभाऊ बागडे नाना यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. आयाशा शेख हीने कठीण परिस्थितीवर मात करत या पदापर्यंत पोहोचली आहे. फुलंब्री तालुक्यात मुस्लिम समाजातून या पदासाठी निवड होण्याचा प्रथम मान मिळवला. याबद्दल आयशा व तिच्या परिवाराचा सत्कार करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ नेत्या मंगलताई वाहेगावकर, भाजपा महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षा तथा मा. पंचायत समितीच्या सदस्या सौ. ऐश्वर्याताई गाडेकर, श्री. अभिषेक पा. गाडेकर, तिरंगा करिअर अकॅडमीचे अमोल डकले सर, श्री. सुरेश बोर्ड , आयशा शेखचे वडील शेख शरीफ युसुफ, आई शेख परवीनबी, आजोबा शेख युसुफ सांडू, आजी शेख भिकाबी, भाऊ शेख सोयफ शरीफ, बहीण शेख शबनम शरीफ, त्याचबरोबर शेख अय्युब याकूब, शेख बिस्मिल्ला सांडू, शिवाजी श्रीखंडे, शेख अकील, सय्यद जुबेर, शेख बशीर सांडू, शिवाजी गायकवाड, शेख सोहेल, शेख शमशाद शेख रुकसाना, शेख शरिपा, शेख रुबीना, शेख नसरीन, सय्यद शबाना, सय्यद तसलीम आदींची उपस्थिती होती.

# संभाजी कॉलनीतील पाणी समस्या सोडवा : नरवडे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सिडको एन ६ वार्ड क्र. ६२, संभाजी कॉलनी, ई सेक्टर येथील घर क्र. ई- ३०/१ ते ३०/१६ या घराच्या नळाला गेल्या ०४ महिन्यापासून पाणी येत नाही. इतर गल्ल्यांना मात्र पाणी नियतिपणे येत आहे. एक तर औरंगाबाद शहराला आठवडयातून एक दिवस पाणी येते आणि त्यातही संभाजी कॉलनी ई सेक्टर मध्ये काही घरांना गेल्या ०४ महिन्यांपासून पाणी येत नसल्यामुळे नागरीकांची मोठी गैरसोय होत आहे, त्यामुळे नागरीकांना विकतचे



पाणी घ्यावे लागत असल्याने आर्थिक भूर्दंड सहन करावा लागत आहे. महापालिका पाणीपुरवठा विभागाला यापुर्वी लेखी व तोंडी अर्ज दिलेले आहे, त्या अर्जावर महापालिकेतील पाणी पुरवठयातील कर्मचारी गल्लीमध्ये येवून पाहणी करतात व निघून जातात, पाण्याची समस्या मात्र, आहे तशीच आहे. तसेच एखादेवेळेस पाणी आले तर तेही ड्रेनेज़मिश्रित येते, त्यामुळे या गल्ल्यांना महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाने या भागातील रहिवाश्यांना भर उन्हाळयात पाणी या मूलभूत गरजेपासून वंचित ठेवले आहे. ही समस्या तात्काळ सोडून नागरीकांना मुबलक व सुरळीपणे पाणी देण्यात यावे व ०४ महिन्यांपासून पाणी न दिल्यामुळे संपूर्ण ०४ महिन्याचा पाणीपट्टी कर माफ करण्यात यावा, या मागणीचे निवेदन पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता फालक साहेब यांना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( खरात ) पक्षाचे जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे यांच्या वतीने देण्यात आले आहे. यावेळी आकाश गायकवाड. अक्षय गावडे. उपस्थित होते.




आधुनिक केसरी न्यूज

असंख्य लावणी, भावगीते व भक्तीगीते गाऊन महाराष्ट्राच्या लोकसंगीताचे दालन समृद्ध करणा-या आणि रसिक प्रेक्षकांना आपल्या आवाजाने दिवाने बनवणाऱ्या लोकप्रिय गायक सुलोचना चव्हाण या कोल्हापूरची सून म्हणून प्रसिद्ध होत्या( डावीकडून प्रथम )आणि आपल्या अभिनयाने चित्रपट सृष्टीत अलौकिक, सात्विक, शोजवळ भूमिका करीत चित्रपटाचा पडदा अजरामर करणा-या जेष्ठ अभिनेत्री सुलोचना दीदी कोल्हापूरच्या लेक( डावीकडून दुसऱ्या ) म्हणून प्रसिद्ध होत्या. मुंबईतील राजभवनावर गेट टुगेदर कार्यक्रमात सर्व मान्यवर कलाकारांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यावेळी महाराष्ट्राच्या या अद्वितीय जोडीचा स्नेह उजागर होत गेला. या दोन्ही महान व्यक्ति काळाच्या पडद्याआड जाणे महाराष्ट्राला अस्वस्थ करणारे आहे. हा संग्रहित फोटो सुलोचना चव्हाण यांचे चिरंजीव प्रसिद्ध ढोलकीवादक विजय चव्हाण यांनी खास आधुनिक केसरीसाठी उपलब्ध करून दिला. **(शब्दांकन बाळासाहेब जोगदंड छ.संभाजीनगर )**

# दहावीच्या बोर्ड परीक्षेत यंदाही मुलींनीच मारली बाजी

**प्रगती करिअर अकॅडमी ची 100 टक्के निकालाची परंपरा कायम**

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** नुकताच दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून या बोर्ड परीक्षेत यंदाही मुलींनीच बाजी मारली आहे. कॉपीमुक्त विद्यार्थी भारताचे भविष्य ही संकल्पना बाळगून विद्यार्थी घडवणारी शैक्षणिक संस्थेचा वैजापूर बोरसर येथील निकाल 100 टक्के असतोच

सालाबादप्रमाणे याहिवर्षी प्रगती करिअर अकॅडमी वैजापूरचा निकाल 100 टक्के लागला असून दहावी बोर्ड परीक्षेत अंकिता सचिन कासार हिने सेमी माध्यमातून 88.80 टक्के गुण घेत प्रथम क्रमांक पटकवला असून द्वितीय अंकिता देविदास गलांडे हिने 88.60% गुण घेत तर अंजली भास्कर खरात हिने 87.40% घेत तृतीय क्रमांक पटकावला. तसेच होले मानसी जालिंदर 87.20%( द्वितीय ),माधुरी जगदीश साळुंके 86.60%( तृतीय ),कृष्णा नंदू गोरे 85.40%,अलींना अजीज पठाण 85.40%,रुपाली ज्ञानदेव बनकर 84.80%,जोरे रुपाली भाऊसाहेब 84%,पवार ऋषिकेश लक्ष्मण 84%,गोल्हार तेजस बापू 83.60%,सतीश गोरख गायके 83.40%,रोहित गणेश नागरे 83.40%,कल्याणी लक्ष्मण देवळे 83%,दीपाली संतोष गिरी 82.40%,प्रतीक्षा सीताराम पवार 82.40%,ईश्वर अर्जुन पवार 82%,प्रिया बाबासाहेब लांडे 81.60%,अर्चना अशोक जाधव 81.60%,आदित्य संतोष लोखंडे 78.40,अक्षय नारायण पवार 78.40%,सोनवणे वैष्णवी निवृत्ती 78%,साक्षी पंढरीनाथ अंबिलके 76.80%,कानडे पियूष पोपट 76.80%,मेघराज अरुण धुमाळ 76.20,अभिषेक सुरेश आहेर 70.40% आदिसह उर्वरित विद्यार्थी राधा ज्ञानेश्वर पवार, यश अरविंद शेवाळे,विठ्ठल जंगले,गौरव शेवाळे संह आदी विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहे.उत्तीर्ण सर्व विदयार्थ्यांचे प्रगती करिअर अकॅडमी चे संचालक मार्गदर्शक आर ए त्रिभुवन व सहसंचालक व्ही आर त्रिभुवन यांनी अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या आहेत. पालकांनी आपल्या मुलांच्या स्वबळावर मिळवलेल्या गुणांचा सन्मान करत आंनद व्यक्त केला.

महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या

स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
- मासिक पाळी अनियमित असणे
- हॉर्मोन्स चे असंतुलन
- मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
- PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
- मासिक पाळी बंद होणे
- वारंवार गर्भपात होणे
- श्वेत प्रदर (पांढरे जाणे)

पुरूषांना होणाऱ्या समस्या
- शुक्राणु कमी असणे
- शुक्राणुची गती कमी असणे
- शुक्राणु स्खलन
- स्वप्न दोष
- सेक्स इच्छा कमी होणे इ.

फीस - 300 रू.

संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्सलटींग उपलब्ध

पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.

# समान संधी देऊन महिला सबलीकरण शक्य : सौ. गीते

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित आयुर्वेद महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या वतीने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठाच्या रौप्य महोत्सवी वर्धापन दिनानिमित्त 'महिला सबलीकरण' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. संस्थेच्या राजर्षी शाहू सभागृहात धन्वन्तरी पूजन पोलीस उपायुक्त सौ. अपर्णा गीते यांच्या शुभहस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, अधिष्ठाता डॉ. लता काळे, प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे, प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे, उपप्राचार्य डॉ. जयश्री देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पोलीस उपायुक्त सौ. अपर्णा गीते आपल्या अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन करताना म्हणाल्या की समाजपरत्वे, देशपरत्वे स्त्रियांचे स्थान आणि भूमिका बदललेल्या दिसून येतात. या गोष्टीला त्या त्या समाज व देशांच्या रूढी, परंपरा, मूल्ये, मानदंड जबाबदार असतात. त्यामुळेच संपूर्ण जगाचा विचार करता स्त्री-पुरुषांच्या स्थान व दर्जामध्ये विविधता आढळून येते. सतत महिला सबलीकरण या संदर्भात अनेक व्यासपीठांवर चर्चा होताना दिसते. "महिला सबलीकरण, म्हणजे मानवी व्यवहारांच्या सर्वच पातळींवर स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने संधी उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे." परंतु महिलांना पुरुषांच्या बरोबरीने कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय स्तरातून समान संधी, स्थान व अधिकार देऊन महिला सबलीकरण करणे शक्य आहे. महिला सबलीकरणासाठी विविध कार्यक्रम व ध्येयधोरणे राबविले जात आहेत. त्यातून महिला विकासाचा तसेच महिलांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, वैचारिक, कौटुंबिक, व्यावसायिक अशा विविध घटकांचा विचार केला जात आहे. विश्वातील अर्धी मानवी शक्ती स्त्री आहे. ती शक्ती देशाच्या विकासासाठी महत्त्वाची असल्यामुळे त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

कार्यक्रमाला प्राध्यापक, अधिकारी, डॉक्टर, कार्यालय अधिक्षक, विभागप्रमुख, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. शितल वाघ, डॉ. ऐश्वया कोलांगडे आणि आभार प्रदर्शन डॉ. स्नेहल खोले यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत आणि महाराष्ट्र गीताने करण्यात आली.



# सर्वरोगनिदान शिबिरात ३८०रुग्णांची विनामूल्य तपासणी व औषधोपचार

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** कै. विष्णुपंत जोशी चॅरिटेबल ट्रस्ट वैजापूर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हॉस्पिटल( घाटी ) व शासकीय दंत महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने कै. डॉ.अनिल विष्णुपंत जोशी यांच्या स्मरणार्थ रविवार ( ता.०४ )रोजी सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयातआयोजित मोफत सर्व रोग निदान,उपचार व औषधी वाटप शिबिरात विविध आजारांच्या ३८० रुग्णाची तपासणी तज्ज्ञ डॉक्टर्स कडून करून उपचार व औषधी मोफत प्रदान करण्यात आली,या शिबिराचे उदघाटन समाज कार्यकर्ते मेजर सुभाषचंद्र संचेती, दलित मित्र डॉ.व्ही.जी.शिंदे, आ.रमेश पा. बोरनारे, नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी, उपनगराध्यक्ष साबेरखान, आय.एम.ए. अध्यक्ष डॉ. राजीव डोंगरे, राजूसिंह राजपूत, श्रीमती ज्योतीताई जोशी, सौ.अंजली जोशी व शकुंतला संचेती यांच्या द्वारे द्वीप प्रज्वलन करून झाले. प्रास्ताविक ॲड, समीर जोशी यांनी केले. सुत्रसंचलन माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले तर आभार सुधीर लालसरे यांनी मानले. या शिबिरात रक्तसंकलन ही करण्यात आले. आ.बोरनारे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी यांनी व मेजर सुभाषचंद्र संचेती यांची ही भाषणे झाली,या प्रसंगी भाऊसाहेब ठोंबरे,मर्चंट बँक चेअरमन विशाल संचेती, डॉ.सुभाष भोपळे,भगवान तांबे, दशरथ बनकर, प्रशांत कंगले डॉ. निलेश भाटिया, स्वप्नील जेजुरकर,डॉ. नितेश शहा, सुरेश तांबे, प्रशांत त्रिभुवन, विजय वेद यांची उपस्थिती होती. डॉ अश्विन जोशी, सचिन जोशी, ॲड. समीर जोशी, राजू लालसरे, अमृता जोशी, ज्योती जोशी ,गिरीश भालेराव, सोमन लालसरे,रोहित जोशी,पुरूषोत्तम पवार यांनी उपस्थितांचे स्वागत केले.






# सावळदबारा येथे वटपौर्णिमा सण महिलांनी मोठ्या आनंदात केला साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे भगवान चक्रधर स्वामी मंदीराच्या समोर असलेल्या वटवृक्ष सुमारे चारशे ते पाचशे वर्षांपूर्वीचा आहे, असे जाणते लोक सांगतात या वटवृक्षाची पुजा दि.३/६/२०२३ रोजी वटपौर्णिमा निमित्ताने महिलांनी मोठ्या आनंदात साजरा केली आहे वटपौर्णिमा हा सण परिसरात तालुक्यात

मोठ्या आनंदात आणि उत्सवात साजरा केला आहे. सावळदबारा मधील बायकांनी ही हा सण मोठ्या आनंदाने साजरा केला. हा सण बायकांचा असतो. हा सण साजरा करण्या संदर्भात एक पौराणिक कथा सांगितली जाते. या वटपौर्णिमेच्या दिवशी सत्यवान सावित्री यांची कथा सांगितली जाते. जेव्हा सत्यवान ला मरण येत तेव्हा, त्याची धर्मपत्नी सावित्री एक व्रत करते पूजा पाठ करते आणि आपल्या पती साठी उच्च आयुष्य मागते. हा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन आज ही बायका या सणाच्या दिवशी अगदी सजून, मराठमोळा साज श्रृंगार करून वडाच्या झाडाची पूजा करतात. अन् दोरा गुंडाळत एकूण सात फेऱ्या मारतात. आणि हाच पती सात जन्म मिळु दे अशी प्रार्थना करतात. बायका या सणाचा भरभरून आनंद लुटतात एकमेकींना हळदी कुंकू ही देता, थोरा मोठ्यांचे आशीर्वाद घेतात. अशा प्रकारे हा सण केवळ महाराष्ट्रात च नाही तर जगभर मोठ्या आनंदात उत्सवात साजरा करण्यात आला. याप्रंसगी गावातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर